# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 25 अंक 10 जानेवारी 2015

ह्या अंकात

| | | |
|---|---|---|
| 2. | धर्मनिरपेक्ष शासन व लोकशाही | *नलिनी पंडित* |
| 3. | मन केले ग्वाही: प्रजा अडाणीच ठेवावी! (लेखांक 2) | *नंदा खरे* |
| 7. | ‘पब्लिक’ विचारवंतांचे महत्त्व :रोमिला थापरांच्या तोंडून | *प्रफुल्ल बिडवई* |
| 11. | स्वच्छता अभियान: गांधी, मोदी आणि लेनिन | *सुभाष थोरात* |
| 14. | जागतिकीकरणाने सबका विकास? | *सुलभा ब्रह्मे* |
| 17. | आत्मा आणि मानवी मेंदू | *य.ना.वालावलकर* |
| 20. | जेत | *नंदा खरे/पद्मजा फाटक* |
| 21. | कुटुंबसंस्था: काही प्रश्न | *छाया दातार* |
| 26. | रॅट रेसचा विळखा! | *प्रभाकर नानावटी* |
| 29. | संपादक, आजचा सुधारक ... | *दिवाकर मोहनी* |

संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1918-2006)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**

**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com

# धर्मनिरपेक्ष शासन व लोकशाही

धर्मनिरपेक्ष शासन हा लोकशाहीचा पाया आहे. भारतातील आजचे बहुसंख्य पक्षही धर्मनिरपेक्ष शासन व लोकशाही ही मूल्ये मानणारे आहेत. पण आपापसातील तंट्यांमुळे काँग्रेस पक्ष सध्या विघटित झाला आहे. सोवियत युनियनच्या विघटनानंतर मार्क्सवादी पक्ष हतबल झालेल आहेत आणि लोकशाही समाजवादी पक्ष संपुष्टात आले आहेत. त्यामुळे सामाजिक व राजकीय प्रश्नांवर लोकांचे प्रबोधन करणाऱ्या संघटना अभावाने आढळतात. जमातवादाच्या यशाचे हे खरे कारण आहे. हिंदू धर्म हा जातिश्रेष्ठतेच्या कल्पनेवर आधारलेला असल्यामुळे तो लोकशाहीच्या मार्गातील एक मोठा अडसर आहे हे तर खरेच, पण त्याच कारणामुळे हिटलरसारखी ठोकशाहीवर आधारलेली संघटना स्थापन करणेही हिंदुत्ववाद्यांना अवघड आहे. पण त्यामुळे गाफिल राहून चालणार नाही. म्हणून धर्मनिरपेक्ष शासन व लोकशाही या मूल्यांवर ज्यांची श्रद्धा असेल त्यांनी मध्ययुगीन मूल्यांना व जातीय उच्च - नीचभावाला विरोध करून जरूर त्या सामाजिक सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत आणि निरनिराळ्या प्रकारच्या संघटना काढून हुकुमशाहीला विरोध करण्यासाठी लोकमत तयार केले पाहिजे. भारतात लोकशाही टिकवून धरण्याचा तोच एक मार्ग आहे.

*नलिनी पंडित*

-*धर्म, शासन आणि समाज* या पुस्तकातून

●●●

# मन केले ग्वाही: (लेखांक 2)
# प्रजा अडाणीच ठेवावी!

*नंदा खरे*

विवेकवाद सामाजिक समस्या खाजाउ इतिहास शिक्षण

भारताच्या स्वातंत्र्यचळवळीचे बहुतेक नेते उच्चशिक्षित होते. बरेचसे बॅरिस्टर होते. इतर बरेच मानव्यविद्यांचे विद्यार्थी होते. यामुळे सुरुवातीची मंत्रीमंडळेही बहुतांशी उच्चशिक्षित असत. कायदा-मानव्यविद्यांसोबत त्यांत काही डॉक्टर - इंजिनीयरही असत. हे स्वाभाविक होते कारण चळवळींचे नेते लढाऊ असावे लागतात, तर मंत्री व्यवहारी आणि नियोजनाचा विचार करणारे असावे लागतात.

पहिली चाळीस-पन्नास वर्षे मंत्रिमंडळे अशी वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञांमधून निवडली जात. अगदी सुरुवातीला तर हे फारच आवश्यक होते, कारण तुटपुंज्या संसाधनांमधून नवे, महाकाय राष्ट्र उभारायचे होते, आणि यासाठी योद्ध्यांऐवजी तंत्रज्ञ जास्त आवश्यक होते. त्याहीपेक्षा आवश्यक होते शिक्षक, जे चांगले, तंत्र जाणणारे नागरिक घडवू शकतील. माझ्या इंजिनीयरिंग क्षेत्रात तर मंत्री म्हणून चांगला तंत्रज्ञ व चांगला शिक्षक, असे दुहेरी व्यक्तिमत्त्व होते. के.एल.राव यांचे काँक्रीट डिझाइनचे पाठ्यपुस्तक आम्ही वापरत असू व ते मंत्रीमंडळातही होते. 1950-64 या काळात ''नेहरू पंतप्रधान असेपर्यंत

इंजिनीयरांना कामे मिळतीलच, भले इतरत्र बेकारी असो!", असे बोलले जाई. आणि असाच प्रकार वैद्यक, शेती वगैरे क्षेत्रांतही होता.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात सरकारने अनेक चांगली तंत्रमहाविद्यालये उभारली. अभियांत्रिकी शिकवायला कार्यशाळा, प्रयोगशाळा लागतात. वैद्यक शिकवायला प्रयोगशाळा, संलग्न इस्पितळे लागतात. शेती शिकवायला शेते लागतात. सर्वांनाच ग्रंथालये व अध्यापक लागतात. ही सारी गुंतवणूक प्रचंड असते व काही अपवाद वगळता ती गुंतवणूक सरकारनेच केली. या गुंतवणुकीचा परतावाही लवकरच मिळू लागला.

रस्ते, सिंचन, वीज उत्पादन, लोखंड, सीमेंट, इतर अनेक कळीची उत्पादने भारतातच होऊ लागली. हा अग्रक्रम आज प्रश्नांकित केला जातो. तेव्हा मात्र तो आवश्यकच होता.

वैद्यक-शिक्षणाचा परतावा आणिकच थेट होता. स्वातंत्र्य मिळताना जेमतेम 32 वर्षे असलेली सरासरी आयुर्मर्यादा आज 64 वर्षांवर पोचली आहे. अर्थात याने लोकसंख्यावाढीलाही चालना मिळाली व त्याने सर्वच प्रश्न तीव्र होत गेले.

खरे दुर्लक्ष झाले शेतीकडे. शेतीशिक्षण घेतलेल्यांपैकी फारच थोडे थेट शेतकरी झाले. बहुतेकांनी सरकारी नोकऱ्या हेच उद्दिष्ट मानले. मानव्यविद्या, ज्यांना एकेकाळी 'उदारमतवादी कलाशाखा' (Liberal Arts) म्हटले जात असे, त्यांत फारशी गुंतवणूक झाली नाही. यामुळे बहुतेक तंत्रविद् चांगले नागरिक मात्र झालेले नाहीत.

वैद्यकातल्या यशाचा एक परिणाम म्हणजे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांची संख्या प्रचंड झाली. सुरुवातीला तरी सर्वांना शिक्षित-सुशिक्षित करणे हे सरकारचे ध्येयच नसावे. काही वर्णांत, काही जातींत शिक्षणाची परंपरा असायची, व ह्या वर्ण-जाती साऱ्या सुविधा वापरायच्या. शिक्षणाची परंपरा नसलेल्या घरांमध्ये ती परंपरा पोचतच नसे. हळूहळू शिक्षणाचा स्तर आणि उत्पन्नाचा स्तर यांतला संबंध जास्तजास्त प्रमाणात लोकांना जाणवू लागला, आणि शिक्षणव्यवस्थेवरचा संख्येचा दबाव आणिकच वाढला. याने दर्जा तर खालावलाच, पण शिक्षणापर्यंत पोचता येणे - न येणे यावरून सामाजिक तणाव वाढत गेले. मंडल आयोग, आरक्षण विरोध, यांभोवतीचे वाद अत्यंत तीव्र होऊ लागले.

आर्थिक उदारीकरणाची व 'आजचा सुधारक'ची सुरुवात होईपर्यंत हे वाद टिपेला पोचले. त्यातच (महाराष्ट्रात तरी) सहकारी चळवळीने श्रीमंत झालेल्या नेत्यांना शिक्षणक्षेत्र खुणावू लागले. रयत शिक्षण संस्था व त्याला समांतर शिक्षणसंस्थांमधला आदर्शवाद संपून शिक्षणाचे व्यापारीकरण होऊ लागले. सुरुवात जरी खाजगी अभियांत्रिकी विद्यालयांपासून झाली तरी लवकरच वैद्यक, डी.एड. – बी.एड.शिक्षण, यांतही खाजगीकरणाने वेग घेतला. दर्जा अधिकाधिक खालावत गेला. जरी आज अनेक लोक दर्जा घसरण्यात आरक्षणाचा भाग महत्त्वाचा मानतात, तरी प्रत्यक्षात खाजगीकरण जास्त महत्त्वाचे होते. 'असर' (ASER, शैक्षणिक दर्जा तपासण्याची यंत्रणा) हे सर्वेक्षण सातत्याने घसरणारा दर्जा नोंदते आहे. त्यातही खाजगी प्राथमिक - माध्यमिक शाळांमधले शिक्षण शासकीय शाळांमधल्या शिक्षणापेक्षा वाईट असते, हेही 'असर' कार्यकर्ते सांगतात.

आज 'शिक्षणाचा हक्क' (Right to Education) हा कायद्याने बहाल झाला आहे. प्रत्यक्षात मात्र चांगले शिक्षण मिळवणे फक्त श्रीमंतांनाच शक्य होते आहे.

केंद्र सरकार, राज्य सरकार बदलले तर एकूण शिक्षणावरचा खर्च बदलणे आपण सहज समजू शकतो. अभ्यासक्रम बदलणे, पाठ्यपुस्तके बदलणे, हे मात्र बहुधा भारतातच होत असावे. 'आजचा सुधारक'ने वाजपेयी सरकारच्या काळातल्या

शिक्षणाच्या 'भगवीकरणा'ची (Saffronization) दखल घेतली. आज मात्र त्यापेक्षा आग्रहीपणे, अविचारीपणे अभ्यासक्रमांमधला मजकूरच, content च बदलायचे प्रयत्न होत आहेत. आणि ते नुसतेच निषेधार्ह नसून थेट घृणास्पद आहेत.

आणि हे थेट उलटी गंगा वाहवणे आहे. वाजपेयी सरकारात मानवी संसाधनांचे (शिक्षणाचे) मंत्री होते मुरली मनोहर जोशी. ते स्वतः भौतिकीत आचार्यपद मिळवलेले होते. पण तरीही 'पारंपरिक ज्ञान' या वर्गीकरणात ज्योतिष्य शिकवायचा प्रयत्न मु. म. जोशींनी केला आणि कुठेकुठे तो यशस्वीही झाला. नंतरची दहा वर्षे (2004-14) अभ्यासक्रम ठरवण्याचे काम अकादमीय विद्वानांकडे सोपवले गेले, आणि त्यात सरकारने ढवळाढवळही केली नाही. आता मात्र नव्याने अभ्यासक्रमांत सरकारी हस्तक्षेप वाढत आहे. हिंदुत्ववादी पठडीबाहेरील सर्व विद्वान सरसकट 'मार्क्सवादी' ठरवले जात आहेत व बाद केले जात आहेत. रोमिला थापर, जगन्मान्य इतिहासकार, यांनी नुकत्याच दिलेल्या एका व्याख्यानात हे स्पष्ट केले. तर्काधिष्ठित आणि अनुभवसिद्ध विज्ञान-परंपरेला यामुळे घोर इजा होते आहे, हेही थापरांनी सप्रमाण ठसवले. पण!

पण आज ICHR (इंडियन काऊन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रीसर्च) या संस्थेच्या प्रमुखपदी प्रा. वाय. सुदर्शन राव यांची नेमणूक झाली आहे. त्यांनी एकाही अकादमीय नियतकालिकात एकही शोधनिबंध प्रकाशित केला नाही. साध्या, जनसामान्यांसाठीच्या पत्रिकांमध्ये 'रामायण - महाभारत ही महाकाव्ये नसून शब्दशः खरा इतिहास आहे' असे सांगणारे लेखनच रावांच्या खात्यावर आहे. नेमणुकीनंतरच्या पहिल्याच जाहीर वक्तव्यात जातिभेदाचे समर्थन करण्याची 'कामगिरी'ही रावांच्या खात्यावर आहे.

विवेकवादाची कास सोडली जात आहे.

का होत आहे हे? सुजाण प्रजा शासकांना प्रश्न विचारते. दिल्ली विद्यापीठातले हिंदीचे प्राध्यापक अपूर्वानंद नोंदतात की गेली दहा वर्षे विद्यार्थ्यांपुढे मतांचे पर्याय ठेवून त्यांना आपली मते घडवू देण्यावर प्रयत्नपूर्वक भर दिला जात होता (A Textbook For Our Times, Indian Express, 15 Nov. 2014). आणि एकाधिकारी (totalitarian) वृत्तीच्या शासकांना कोणीही प्रश्न विचारणे आवडत नाही; विशेषतः प्रजाजनांपैकी कोणी विचारणे तर द्रोही मानले जाते.

तर आजच्या राज्यकर्त्यांना हवी आहे ती अडाणी, मुकाट आज्ञापालन करणारी, 'मुकी बिचारी कुणीही हाका' अशी प्रजा. मूळ पंक्ती आहेतः

*'मुकी बिचारी कुणीही हाका*
*अशी मेंढरे बनू नका.'*,

आणि या सल्ल्याचे लक्ष्य प्रजा हे नसून शिक्षक हे आहे. तर आज शिक्षणाचे 'प्रश्नकर्ते घडवा' हे रूप बदलून मुक्या मेंढरांनी घडवलेली मुकी मेंढरे करण्याचा कार्यक्रम आहे.

याचे एक टोकाचे उदाहरण उत्क्रांतीच्या तत्त्वाबाबत अमेरिकेत दिसते आहे.

कॅथलिक चर्चच्या 'पाँटिफिकल अकॅडमी ऑफ सायन्सेस'ने खालील मत नोंदल्याला पंचविसावर वर्षे झालीः

"खूप पुराव्यांमुळे माणूस व कपींना उत्क्रांतीचे तत्त्व लावणे वादातीत आहे, हे आम्हाला पटले आहे."

नुकतेच खुद्द पोपही जाहीरपणे उत्क्रांतीला वैधता देऊन गेले. पण!

पण अमेरिकेतले हिंदुत्ववादी गट आपली विश्वरूपचित्रे अमेरिकन अभ्यासक्रमांत सामील करू पाहत आहेत. या चित्रांमधे आहे काय?

हे विश्व 1,55,000 अब्ज वर्षांपूर्वी घडले (त्यातल्या त्यात ग्राह्य वैज्ञानिक मत '14 अब्ज' हा आकडा सांगते).

भारतातली पहिली मानवी वसाहत 190 कोटी वर्षांपूर्वी घडली (आजचे विज्ञान आजच्या मानवाला, Anatomically Modern Man ला, फारतर एखादा लाख वर्षे जुना मानते).

पहिली आधुनिक मानवी संस्कृती भारतात क्रि. श. पू. 8,000 मध्ये घडली (आज भारतातले पहिले दगडांच्या कपऱ्याचे साठे क्रि. श. पू. 9,600 मधले आहेत. आता त्यांना 'संस्कृती' म्हणावे हे अत्यंत विवाद्य ठरेल!).

27 फेब्रुवारीला कॅलिफोर्निया बोर्ड ऑफ एज्युकेशनने पाच विरुद्ध शून्य मताने हिंदुत्वमत धिक्कारले आहे.

म्हणजे पुराणातल्या वानग्या देण्याचा आपला मूर्ख 'छंद' आता साता–समुद्रांपलिकडेही सर्वज्ञात होत आहे. गांधारीच्या शंभर पुत्रांच्या कथेला बायोटेक्नॉलॉजी मानणे, हत्तीचे डोके माणसाच्या (मळाचा माणूस!) धडावर लावण्यातून 'प्लास्टिक सर्जरी'चे ज्ञान दिसते असे मानणे; असले हास्यास्पद दावे 'उच्चपदस्थ'ही करू लागले आहेत. आजची शिक्षणव्यवस्था विद्यार्थ्यांना खरे-खोटे, चांगले-वाईट यांत फरक करायला शिकवत नाही आहे, हे स्पष्ट आहे. 'आपल्या उज्ज्वल इतिहासा'चा गर्व वाढतो आहे, त्यामुळे सुधारणा अधिकच अवघड होणार आहे.

भोवतालचे जग, त्यातल्या घटना वगैरे समजावून देणारी आणखीही एक यंत्रणा आहे; वृत्तमाध्यमे व ज्ञानमाध्यमे. पूर्वी दैनिकांच्या रविवार आवृत्त्या 'ज्ञान आणि मनोरंजन' असे स्तंभ चालवीत. आज मनोरंजन, तेही चटपटीत उथळ, हे वृत्तमाध्यमांवरही ताबा मिळवत आहे. कसा झाला हा बदल?

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा प्रसारमाध्यमांमध्ये नियतकालिके (प्रिंट मीडिया) आणि रेडिओ ही दोन मोठी क्षेत्रे होती. रेडिओ पूर्णतः सरकारी, तर नियतकालिके बहुशः खाजगी होती. उदारीकरणाच्या सुरुवातीपर्यंत यांत सरकारी दूरचित्रवाणीही (दूरदर्शन, डी.डी.) जोडली गेली होती.

नियतकालिके सरकारवर भरपूर टीका करत. 'शंकर्स वीकली' सारखी व्यंगचित्रांतून टीका करणारी नियतकालिके मात्र निर्मात्यांसोबतच संपत. पण तरीही 'इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली.', 'क्वेस्ट', 'सेमिनार', 'समाज प्रबोधन पत्रिका', अशी अभ्यासू नियतकालिके वाचकांना सुजाण करायला धडपडत असत. रेडिओ, दूरदर्शन यांच्या कार्यक्रमांतही शहरी व ग्रामीण, स्त्रिया व पुरुष, मुले व प्रौढ, साऱ्यांसाठी चांगले, प्रेक्षणीय, श्रवणीय असे ज्ञानाधारित कार्यक्रम असत.

पण प्रगत देशांतील माध्यमे खरे सत्यकथन करतात, की कोणत्यातरी गटाच्या चालचलणुकीसाठी सर्वसंमती घडवायला पूरक बातम्या देतात, असा प्रश्न उपस्थित झाला होता. चोम्स्की आणि हर्मन यांचे 'मॅन्युफॅक्चरिंग कन्सेंट' हे पुस्तक (1988) या प्रश्नाला भिडले होते. उदारीकरणाने हा प्रश्न भारतातल्या जनतेनेही विचारायला हवा, याची निकड उत्पन्न केली.

चटपटीत मनोरंजक नियतकालिकांचा महापूर वाहू लागला. दूरचित्रवाणीच्या खाजगी वाहिन्यांमध्येही प्रचंड वाढ झाली. एफ.एम.रेडिओ हे शुद्ध मनोरंजनाचे माध्यम घडले.

चोम्स्की-हर्मन यांना अमेरिकेत बातम्या पाच चाळण्या लागून मगच लोकांपर्यंत पोचतात असे जाणवले होते. या चाळण्यांबाबत भारतातली आजची स्थिती नोंदू या.

- नवे नियतकालिक/वाहिनी/रेडिओ केंद्र सुरू करणे अत्यंत महाग झाल्याने स्वतंत्र माध्यमे घटत जाऊन काही मोठ्या माध्यमगृहांतच माध्यमसत्ता एकवटत जाते. भारतात आज सर्व मोठी माध्यमे मूठभर व्यापारी-संस्थाच नियंत्रित

करतात. उदा. टाईम्स ऑफ इंडिया व संलग्न नियतकालिके, टाईम्स नाऊ वृत्तवाहिनी, मूव्हीज नाऊ चित्रपट वाहिनी, टाईम्सचा एफ. एम. रेडिओ, इत्यादी. एका डाव्या पक्षाने नाशिक-उत्तर महाराष्ट्रात एक नवे दैनिक सुरू करायचा विचार केला. खर्च दोन कोटी आहे असे निघाल्याने माघार घेतली!

- जाहिरातींमधून मिळणारे उत्पन्न नियतकालिके व वाहिन्यांच्या वाचक-प्रेक्षकांच्या वर्गणी-उत्पन्नाच्या कैक पट झाल्याने वृत्तसंकलनाचा 'स्वभाव'च बदलतो. वाचक-प्रेक्षकांऐवजी जाहिरातदारच बातम्या निवडू लागतात. इंटरनेटवर 'सिटिझन जैन' असा गूगलशोध घेतल्यास असे आढळेल, की टाईम्सचे समीर जैन स्वतःला वृत्तव्यवसायात न धरता जाहिरातव्यवसायात धरतात!
- भरवशाची माहिती व आकडेवारी फक्त सरकारी व कॉर्पोरेट सूत्रांकडूनच मिळू शकते, आणि या संस्था सोयीस्कर माहितीच देतात.
- नागपुरातली पाणी-वितरणव्यवस्था नगरपालिकेने व्हिओलिया (Veolia) या खाजगी कंपनीकडे सोपवली. एका सेवाभावी (NGO) संस्थेने व्हिओलियाला एका पेठेत नवे मीटर बसवण्याच्या खर्चाचा तपशील मागितला, माहितीच्या अधिकारात. उत्तर आले, "वीस हजार घरांमागे, कागदासाठी तीन रुपये दराने साठ हजार रुपये भरा''. कंपनीने कुठेतरी वीस हजार घरांच्या मीटरिंगच्या खर्चाचे एकत्रीकरण (Abstract) केले असणारच. पण आपण सोडून इतर कोणी ही माहिती देऊ शकणार नाही या खात्रीतून 'अशक्य' मार्ग दाखवला गेला. आज तर व्हिओलिया कंपनीची जागा ऑरेंज सिटी वॉटर या कंपनीने घेतली आहे. ती कंपनी आपल्याकडे माहितीच नाही, असा दावा करू शकते!
- भिन्न मत किंवा विरोधी मत मांडणाऱ्यायावर टीकेचा गदारोळ उठवून तसल्या लोकांना मूर्ख आणि वेडे ठरवले जाते. माध्यमांमध्ये असे थेट चारित्र्यहनन होत असताना त्याचे बळी कोठे उत्तरही देऊ शकत नाहीत.महाराष्ट्राने हा प्रकार गो.रा.खैरनार, अण्णा हजारे, मेधा पाटकर यांच्या बाबतीत पाहिला आहे. आज तेच शस्त्र माधव गाडगीळ या ऋषितुल्य परिसरशास्त्र्यावर वापरले जात आहे.
- चोम्स्की - हर्मन अमेरिकेत एखाद्या मताला कम्युनिस्ट ठरवून कसे निष्प्रभ केले जात असते ते नोंदतात. 'आजचा सुधारक'साठी चोम्स्कीच्या मतावर लेख लिहिणारे जयदेव डोळे 'भारतात हा धोका नाही' अशा अर्थाचे मत नोंदून गेले. आज तेही खरे नाही. रोमिला थापर नोंदतात की आज सर्व भिन्नमतधारकांवर 'मार्क्सिस्ट' असा शिक्का मारायची पद्धत रूढ होते आहे!

पण आज चोम्स्की-हर्मनही एका पिढीपूर्वीचे झाले आहेत. त्यांच्या चाळण्या भेदून खरी माहिती कशी मिळवावी आणि कशी पसरवावी, यावर बराच विचार झाला आहे; होतही आहे. उलट्या दिशेला सरकारे (राजकीय सत्ताधीश) आणि कॉर्पोरेशन्स (आर्थिक सत्ताधीश) सामान्य जनांना कसे चकवावे याची तंत्रे घडवत आहेत.

भारत-सरकारने काही वर्षांपूर्वी एक माहितीचा अधिकार कायदा (RTI) पारित केला. कोणीही नागरिक विशिष्ट पद्धती वापरून सरकारकडे असलेली माहिती मागू शकतो, व ती मिळवणे हा त्या नागरिकाचा मूलभूत हक्क मानला जावा, असे सांगणारा हा कायदा. याला पूरक असा जागल्या कायदा (Whistle-blower Act) इतर काही देशांत आहे. एखाद्या सरकारी खात्यात किंवा कंपनीत काही बेकायदेशीर कृत्ये केली जात असतील तर तिथल्या कर्मचाऱ्यांना योग्य ठिकाणी हे गुन्हे जाहीर

करण्याचा अधिकार देणारा हा कायदा आहे. दोन्ही कायदे नागरिकांना माहिती देण्यास सत्ताधाऱ्यांना बाध्य तरी करतात, किंवा अशी माहिती देणाऱ्यांना वैधता तरी देतात.

अर्थातच संरक्षण खाते, परराष्ट्र खाते, न्यायपालिका वगैरे खाती ''आम्हाला यातून वगळा'' असे म्हणू लागतात. कॉर्पोरेशन्सबद्दल तर स्थिती आणिकच गुंतागुंतीची होते.

आणि शेवटी जागल्यांना व माहिती मागणाऱ्यांना गप्प करायचे इतरही मार्ग आहेत.

जॉर्ज पॅकर याचा एक लेख 13 नोव्हें. 2014 ला 'न्यू यॉर्कर' मासिकात प्रकाशित झाला, 'व्हाय द प्रेस इज लेस् फ्री टुडे'. लेखाचा मुख्य आधार आहे 'द न्यू सेन्सॉरशिप' हे जोएल सायमनचे पुस्तक. सायमन हा 'कमिटी टु प्रॉटेक्ट जर्नलिस्ट्स'चा (CPJ) संचालक आहे. वार्ताहरांबद्दल पॅकर लिहितो, "वार्ताहर जर आपले काम नीट करत असतील तर त्यांना उच्चपदस्थांत मित्र असू शकत नाहीत. सरकारे, कॉर्पोरेशन्स, सशस्त्र विद्रोही गट, यांना वार्ताहर उपयुक्त केव्हा होतात, तर ते आपल्या पेशाशी गद्दारी करतात तेव्हा. सामान्य जनांमध्येही वार्ताहरांना आधार नसतो. कित्येक ठिकाणी सत्यकथन करणारे कोणत्यातरी गटाच्या द्वेषाचे आणि हिंसेचे बळी ठरतात." सायमन सत्यवार्ता सांगणे अवघड का होत आहे याची चार कारणे नोंदतो. त्यातले मुख्य आहे बहुमतवाद!

निर्वाचित नेत्यांचा बहुमतवाद. सायमन रशिया, तुर्कस्तान, व्हेनेझुएला, इक्वाडोर व बोलिव्हिया या देशांची नावे घेतो. मी मोदींच्या भारताचे नावही जोडू इच्छितो. हे बहुमतातले नेते सायमनच्या मते लोकहुकूमशहा, democratators होतात, विरोधी मते सहन न करणारे.

तर अशा रीतीने एकीकडे शिक्षणव्यवस्था दुबळी होत आहे, आणि दुसरीकडे माध्यमे विविध दबावांखाली ना खरी वार्ता देत आहेत, ना त्यांचा अर्थ लावण्याचे ज्ञान देत आहेत. आणि चांगली सार्वजनिक शिक्षणव्यवस्था, तटस्थ, वाचकनिष्ठ वार्ताहरकी, यांचा ऱ्हास बव्हंशी खाजगीकरणाचा परिणाम आहे. विद्यार्थीसंख्येच्या दबाखाली शिक्षणाचे व्यापारीकरण मान्य केले गेले आहे. चोम्स्की-हर्मनच्या माध्यम-चाळण्या शक्तिमान गटांच्या धोरणांना अपरीक्षित संमतीच केवळ देत आहेत.

vidya_nand@hotmail.com

●●●

# ' पब्लिक' विचारवंतांचे महत्त्व: रोमिला थापरांच्या तोंडून

*प्रफुल्ल बिडवई*

समाज धर्म इतिहास

आणीबाणीच्या काळात भाजपचे लाल कृष्ण अडवानी माध्यमांबाबत म्हणाले, "त्यांना वाकायला सांगितले तर ते रांगू लागले" लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानल्या गेलेल्या माध्यमांनी आपले स्वातंत्र्य आणि सचोटी कसे घालवले, यावरचे अडवानींचे भाष्य भाजपेतरांना आणि विचारवंतांनाही कौतुकास्पद वाटले होते.

आज माध्यमेच नव्हे तर शिक्षण, सांस्कृतिक व्यवहार, आरोग्यसेवा, विधिव्यवस्था वगैरे क्षेत्रांतील मान्यवरही राष्ट्रीय स्वयंसेवक संघापुढे रांगू लागले आहेत; आणि त्यांना कोणी वाकायलाही सांगितलेले नाही.

12 ऑक्टोबरला रा.स्व.संघाच्या दिल्ली प्रांत प्रमुखांनी साठ मान्यवरांना सरसंघचालक मोहन भागवत यांच्यासोबत दुपारच्या जेवणासाठी बोलावले. जागा होती, दिल्ली–पंजाब–हरियाना चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज. आमंत्रितांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष वेद प्रकाश, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरु दिनेश सिंग, AIIMS चे संचालक एम. सी. मिश्र, ॲडिशनल सॉलिसिटर जनरल तुषार मेहता, हृदयांवर शल्यक्रिया करणारे नरेश त्रेहान व के. के. अगरवाल, नृत्यांगना सोनल मानसिंग वगैरे लोक होते. अनेक जण 'फक्त ऐकायला गेलो/गेले' असे सांगत होते. माध्यमांत मात्र त्या जेवणाला हजेरी लावणे हा उगवत्या सूर्याला नमस्कार होता असे सुचवले गेले. सत्ताधारी पक्षाच्या जनक संघटनेच्या अ–निर्वाचित प्रमुखापुढचे हे लोटांगण या सर्वांच्या पदांच्या व कर्तव्यांच्या संदर्भात तर अशोभनीय होतेच, शिवाय ते लोकशाही संकेतांच्याही विरोधात होते.

आश्चर्य म्हणजे माध्यमे, राजकीय पक्ष, कोणीही या प्रकरणाबाबत हूं का चूं केले नाही. 2000 साली मात्र काऊन्सिल फॉर सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रीसर्चचे संचालक माशेलकर आग्रा येथे संघाच्या प्लॅटिनम महोत्सवात सामील झाले तेव्हा गदारोळ उठला होता.

आज संघ आणि भाजप शासकीय धोरणांत मूलभूत बदल करू पाहत आहेत. संघ परिवार आणि मंत्रिगण यांच्यात याबाबतच्या दोन प्रदीर्घ आणि सुरचित बैठका झाल्या आहेत. संघ परिवाराला अपेक्षित बदलांची एक प्रमुख दिशा आहे ती शैक्षणिक अभ्यासक्रमांना हिंदुत्वाकडे वळवण्याची. यात सेक्युलरवादी 'चुकीची आकलने' बदलणेही आले. NCERT चे तत्त्वनिष्ठ संचालक परवीन सिंक्लेअर, यांना राजीनामा द्यायला बाध्य केले गेले आहे.

आर्य मुळात भारतातलेच होते, इतिहासज्ञ मानतात तसे बाहेरून आलेले नव्हते, असे सांगण्याची मोहीम दिल्ली विद्यापीठाच्या संस्कृत विभागाने चालवली आहे. यामागील संस्कृतज्ञांना भारताचा इतिहास 'वैदिक काल' आणि 'आर्य संस्कृती' यापलिकडेही असण्याची जाण नाही. 'वैदिक गणित' नावाच्या 1965 साली भारती कृष्ण तीर्थ यांनी लिहिलेल्या वेदांशी कोणताही संबंध नसलेल्या प्रकरणाच्या, शिळ्या कढीला ऊत आणला जात आहे (यातील फोलपणा दाखवणारा सी.के. राजू यांचा लेख http://www.thehindu.com/opinion/of-ed/nothing vedic-in-vedic-maths/article 637389.ecc या संकेतस्थळी भेटेल).

दिनानाथ बत्रा या संघ परिवारातल्या माणसाने काही प्रकाशकांना घाबरवून काही अभ्यासू पुस्तके 'आपणहूनङ्क रद्द करायला लावली. याने उत्तेजित झालेले संघ परिवारातले लोक अ–हिदुत्ववादी पुस्तकांवर बंदी आणण्याच्या मागण्या करू लागले आहेत. विद्यालये, पुस्तकांची दुकाने, कलादालने, नाट्यगृहे, चित्रपटगृहे, साहयांवर धाडी घालून आपल्यापेक्षा वेगळी मते दडपायचे प्रयत्न होत आहेत. वेगळ्या व विरोधी मतांच्या लोकांना 'अ–भारतीय'(भाषांतर : देशद्रोही!) ठरवून त्यांची राजकीय मते, सांस्कृतिक भूमिका, व्यक्तिगत नीतिमत्ता, साऱ्यांवर हल्ले केले जात आहेत.

भिन्न मते, विरोधी मते यांबाबतच्या या असहिष्णुतेला सर्व थरांवर, सर्व प्रदेशांमध्ये उत्तेजन मिळत आहे. सत्ताधारी पक्ष व थेट सरकारही याला आधार देत आहे. ह्यातून इतर पक्षही सुटत नाहीत. काँग्रेस, जात्याधारित व प्रादेशिक पक्ष, डावे पक्ष, सारेच कमीजास्त प्रमाणात भिन्नमताचा अवमान करत सेन्सॉरवजा धोरणे राबवत आहेत. पण त्यांचा भिन्नमतविरोध भाजप–संघ परिवाराच्या विरोधाइतका आतपासूनचा व विखारी नाही. संघ परिवार मात्र वेगळे मत हा द्रोह मानून त्याला कठोरपणे दाबायच्या प्रयत्नात आहे. हे संघातील लोकशाहीविरोधी संस्कृतीला साजेसेच आहे. संघाने 'अंतर्गत लोकशाहीला अडथळे

आणणारा बकवास' मागेच त्यागला, व त्या जागी एकचालकानुवर्तित्व उर्फ 'फ्यूरर–प्रिन्झिप' (नाझी पक्षातील पद्धत) आणून ठेवले.

पण रूढ विचारांपेक्षा वेगळी, विरोधी मते असणे व ती व्यक्त करायला वाव असणे जर आपण गमावले, तर आपण आपसूकच दरिद्री बहुमतवाद आणि हुकूमशाहीकडे जातो. येवढेच नव्हे तर नव्याने ज्ञान मिळवणेही दुरापास्त होते. नैसर्गिक व सामाजिक ज्ञानशाखांमधली प्रगती भिन्नमताच्या अधिकाराखेरीज अशक्य आहे. तशी मते शिक्षणातून दिली जाणे, संवाद व वादविवादांतून सिद्ध–असिद्ध ठरणे, हे निरामय सार्वजनिक क्षेत्रासाठी अत्यावश्यकच आहे.

हा मुद्दा प्रा. रोमिला थापर यांच्या तिसध्या निखिल चक्रवर्ती स्मृती व्याख्यानात कळीचा होता.

(निखिल चक्रवर्ती स्वातंत्र्योत्तर भारतातील वार्ताहरांपैकी एक ज्येष्ठ पत्रकार होते. ते कित्येक वर्षे 'मेनस्ट्रीम' या साप्ताहिकाचे संपादक होते. ते कित्येक वर्षे कम्युनिस्ट पक्षात होते, पण त्या पक्षाचे धोरण त्यागून त्यांनी आणीबाणीवर कठोर टीका केली. परिणामतः ते नियतकालिक काही काळ बंदही पडले. प्रो. थापरांचे व्याख्यान हे तिसरे निखिल चक्रवर्ती स्मृतिव्याख्यान होते. आधीची दोन व्याख्याने अमर्त्य सेन (तत्त्वज्ञ, अर्थशास्त्री) आणि एरिक जे. हॉब्सबॉम (इतिहासकार) यांनी दिली. )

(प्रा. थापर जवाहरलाल नेहेरू विद्यापीठाच्या निवृत्त इतिहास–प्राध्यापक आहेत.)

थापर यांचे व्याख्यान अनेक भौगोलिक खंड व कालखंड यांत विहरणारे होते. त्यात गेल्या दोन हजार वर्षांत सटीक बौद्धिक परंपरा कशाकशा उत्क्रांत झाल्या याचा अप्रतिम आढावा होता. विवेक, साशंकभाव, 'बाबावाक्याङ्कला आह्वान देण्याची परंपरा, यांतूनच सत्य शोधा, असा स्पष्ट संदेश व्याख्यानात होता. नेमक्या याच परंपरांवर आज हल्ला होत आहे.

पाश्चात्त्य जगात सॉक्रेटीसपासून गॅलिलिओपर्यंत, आणि भारतात बौद्ध व चार्वाकांमध्ये भिन्नमतांच्या अभिव्यक्तीतून विज्ञान कसे विकसित झाले हे थापरांनी तपासले. तत्त्वे, परंपरा व पद्धती, या तीन्हींच्या पातळ्यांवर विज्ञान कसे संस्कृतिनिरपेक्ष आहे. हे त्यांनी एथेन्स, अरबस्तान, भारत, चीन इत्यादींच्या इतिहासातून दाखवून दिले. भारतात बुद्धाने देव ही कल्पना अज्ञेयवादातून तपासली. अनेक इहवादी विचारप्रणालींनी कर्मविपाक, पुनर्जन्म व आत्म्याचे अमरत्व नाकारून पशुबळी व वैदिक कर्मकांडांना धिक्कारले. गॅलिलिओच्या हजार वर्षे आधी आर्यभट्टाने राजज्योतिष्यांना विरोध करून पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे दाखवून दिले, व पृथ्वीकेंद्री आकलन खोटे पाडले.

या सर्वांत श्रद्धा व धार्मिक रूढींऐवजी तर्क आणि विवेक यांना सर्वोच्च स्थान देणे कळीचे होते. घटना व त्यांमागील संभाव्य कारणे यांबद्दल संभाव्य तत्त्वे सुचवणे, प्रयोग व अधिक निरीक्षणांच्या कसोटीवर ही तत्त्वे तपासणे, व अखेर भाकिते वर्तवण्याची क्षमता असलेली तत्त्वे घडवणे, अशी ही पद्धत.

इतिहासाच्या विहंगमावलोकनातून थापरांनी विवेक व तर्कनिष्ठता यांचे वेगवेगळ्या जागांमधील व कालखंडांमधील सातत्य दाखवून दिले. या परंपरेला वेळोवेळी धर्मांधांनी विरोधच केला. ब्राह्मणी रूढींनी बौद्धमताला 'भ्रमङ्क मानले. होता होता अनेक ब्राह्मण्यविरोधी पंथ घडले : श्रमण–परंपरा (बौद्ध व जैन), चार्वाक, आजीविक, नास्तिक, इहवादी, विवेकवादी. आणि 'अपौरुषेयङ्क वैदिक मत नाकारणारे, जातिवर्णव्यवस्था नाकारणारे, हे सर्व पंथ 'नास्तिकङ्क या एकाच श्रेणीत कोंबले गेले.

थापर म्हणाल्या की आजचे qहदुत्ववादी जसे सर्व भिन्नमताच्या लोकांना 'माक्सिस्ट' म्हणतात, त्याची आठवण व्हावी अशी ती कोंबाकोंबी होती!

प्राचीन व मध्ययुगीन काळात भारतात अनेकानेक विचारधारा होत्या. त्यांपैकी काही धर्मपीठे व राजसत्ता यांच्या विचारधारांवर शंका घेणाèया होत्या. "अंदाल, अक्का महादेवी, मीरा वगैरे लोक जातिभेद नाकारत असत, आणि सामान्य जन त्यांचे म्हणणे आदराने ऐकत असत ."अमीर खुश्रो कवी आणि संगीतकार तर होताच, पण सूर्यकेंद्री ग्रहमालेची संकल्पना स्वीकारणारा ज्योतिर्विदही होता, व त्यामुळे "कर्मठ इस्लामपासून तो दूरही राहिला."

यानंतर राजा राममोहन रॉय, म. फुले, शाहू महाराज, पेरियार, सय्यद अहमद खान, डॉ. आंबेडकर इत्यादी आधुनिक उदारमतवादी भारतात सुधारणा करून गेले. भारतीय समाजात मोठाले फेरबदल होत आहेत, आणि ते समजून घ्यायला नव्या मर्मदृष्टीची गरज आहे. सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे राजकीय आणि सांस्कृतिक परिणाम समजून घेण्यासाठी हे आवश्यक आहे. थापर म्हणाल्या की विचारवंतांनी (Public Intellectuals) हे सांधे तपासून ''आपल्या बौद्धिक वारशातल्या विवेकवादी विचाराच्या परंपरा उकलून लोकांपुढे मांडायला हव्या आहेत."

"अनेक पेशांमधील विशेषज्ञ बरेचदा आपापल्या विशेष अभ्यासाच्या क्षेत्राबाहेरील जगाबद्दल असंवेदनशील असतात." थापरांच्या मते असे विशेषज्ञ विचारवंत या पदाला पोचत नाहीत. आज कधी नव्हते तेवढे अकादमीय विद्वान आहेत. पण ते सत्तेच्या विचारधारेशी भिडायला अनुत्सुक असतात, आणि याने मुक्त विचाराची वाट खुंटणेही ते मान्य करतात."

विचारवंतांनी सत्ताधाऱ्यांशी जुळत्या भूमिका घेणे टाळायला हवे. त्यांच्या भूमिका स्वायत्त असायला हव्या, व त्या तशा आहेत हे उघडपणे दिसायलाही हवे. वादग्रस्त वाटणाèया भूमिका, मग त्या कोणी का घेत असेना, प्रश्न विचारून तपासल्या जायलाच हव्या. विशेषज्ञांच्या तज्ज्ञतेचे क्षेत्र तर स्पष्ट हवेच, पण नागरिकांचे हक्क काय आहेत याबाबत विचारवंत म्हणून स्पष्ट आणि संवेदनशील भूमिका घेतल्या जायला हव्यात. सामाजिक न्याय कोणत्या कृतीत आहे हे ओळखून त्या कृती सामूहिक धोरणांचा भाग करवण्यास विचारवंतांनी झगडायला हवे.

असे 'पब्लिक' विचारवंत भारतात का मागे पडत आहेत याचे विश्लेषण करून त्यांनी जास्त परिणामकारक व ठोस भूमिका कसा घ्याव्या, ते थापर यांच्या भाषणात स्पष्ट केले गेले. (त्यांचे पूर्ण भाषण http://sacw.net/article 9874.html या संकेतस्थळावर भेटेल).

(प्रफुल्ल बिडवाईंचा वरील लेख त्यांनी अग्रेषित केला त्याच सुमारास 'डॉन' (Dawn) या पाकिस्तानी दैनिकाचे दिल्लीतले वार्ताहर जावेद नकवी यांचा 'हॅव इंटेलेक्चुअल्स बीन को–ऑप्टेड?' हा लेखही इंटरनेटवर उपलब्ध झाला. त्याची मजेदार सुरुवातच फक्त देत आहोत :–

"सम्राट अकबराच्या आग्र्याजवळील कबरीजवळचा एक शासकीय फलक सांगतो की "(अकबराने) एका जमावातून एक राष्ट्र घडवले." गेल्या काही काळात प्रा. रोमिला थापरांना जास्तजास्त प्रमाणात अकबराची ही भूमिका घ्यावी लागत आहे. उजव्या हिंदुत्वनिष्ठांनी चुराडा न केलेल्या मूठभर पब्लिक विचारवंतांमध्ये प्रा. थापर अचलपणे उभ्या आहेत.")

prafulbidwai@gmail.com

●●●

# स्वच्छता अभियान: गांधी, मोदी आणि लेनिन

*सुभाष थोरात*

जात–धर्म खाउजा

जातिव्यवस्थेने व्यवसाय स्वातंत्र्य नाकारून प्रत्येक व्यवसायासाठी एक स्वतंत्र जात निर्माण केली. जिने जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आपल्या जातीला ठरवून दिलेलेच काम केले पाहिजे असा दंडक घातला गेला. या व्यवस्थेनुसार सर्वात घाणेरडे काम, म्हणजे साफसफाईचे काम आणि तिन्ही वरच्या वर्णाच्या लोकांची सेवा करण्याचे काम शूद्र समजल्या जाणाऱ्या जातींवर सोपवण्यात आले. अशा प्रकारे स्वच्छतेची जबाबदारी अतिशूद्रांवर ज्यांना आपण अस्पृश्य जाती म्हणतो त्यांच्यावर सोपवून सगळ्या वरच्या जातींचा समाज निर्धास्त झाला. त्यामुळे `स्वच्छता' हे आपले काम नाही. थे अमुक, अमुक जातींचे आहे ही मानसिकता आजतागायत रूजली गेली आहे.

आजच्या आधुनिक समजल्या जाणाऱ्या, भांडवली समाजातही ती फारशी बदललेली नाही. म्हणून या `साफसफाई'च्या कामात अडकलेले, किंवा परंपरेने अडकवलेले हीन समजल्या जाणाऱ्या जातींचे समूहच दिसून येतात. आधुनिक भाषेत ज्यांना आपण साफसफाई कामगार म्हणतो. `आरक्षणाला' विरोध करणारे वरच्या जातींचे समूह या स्वरूपाच्या कामात आरक्षण मागत नाहीत. या कामातील `ओपन' सीट कधी भरल्या जात नाहीत. भारतीय समाज सामाजिक क्रांतीपासून अजून किती तरी कोस दूर आहे याचे हे निर्देशक आहे आणि ज्याची कोणाला लाज वाटते अशी परिस्थिती दिसत नाही.

खरे तर समाजाचे आरोग्य चांगले रहावे म्हणून सार्वजनिक साफसफाईचे काम करणाऱ्या कामगारांना चांगली वागणूक मिळायला हवी पण परिस्थिती काय आहे? समाजात जे काम वाईट समजले जाते ते काम करणारे सामाजिकदृष्ट्या केवळ खालच्या दर्जाचेच नाहीत तर अस्पृश्य, बहिष्कृत असे आहेत. पण जे कुठलेही उत्पादक काम करीत नाहीत. केवळ धार्मिकदृष्टया त्यांना वरचा दर्जा बहाल केला आहे, ते ऐतखाऊ बांडगुळी–जातसमूह ओळखले जातात `स्वच्छते'मुळे. त्यांना स्वच्छता आवडते. ते कायम `स्वच्छ' रहातात. पण ही स्वच्छता कोण करतं. त्यांच्या आंघोळीसाठी कोण पाणी भरतं? त्यांचे केस कापण्याचे काम कोण करतं? त्यांची बाग सुंदर कोण ठेवतं? यासाठी आजपर्यंत स्त्रिया आणि शूद्र जातीसमूहांचाच वापर केला गेला. आणि हे काम करणारे मात्र अशुद्ध, अस्वच्छ. आहे की नाही उपराटी प्रथा. आजही त्यात फारसा बदल झालेला नाही. आज मुंबई महानगरपालिकेत साफसफाई कामगाराला जे `घर' देण्यात येते. ते जर त्यांचा एक मुलगा त्याच कामावर राहिला तरच त्याला ते मिळते. एकतर तुटपुंज्या पगारावर आणि घाणेरडी कामे `दारू न पिता' करता येत नसल्यामुळे, शिवाय समाजात काहीही किंमत नसल्यामुळे, तो दारूडया बनतो. कायम कर्जबाजारी आणि सावकाराच्या विळख्यात सापडतो. त्यामुळे स्वत:च्या मालकीचे घर घेणे त्याला शक्य होत नाही. पर्यायाने घरासाठी परंपरा चालू रहाण्यासाठी त्याचा एक मुलगा त्याला कामावर ठेवावाच लागतो. आणि परंपरा चालू रहाते.

सफाई कामगारांच्या आरोग्य आणि त्यांच्या हक्कांसाठी काम करणाऱ्या रमेश हरळकरांची गोष्ट अशीच काळजाला चटका लावणारी आहे. अभ्यासात आणि चित्रकलेत हुशार असणाऱ्या हरळकरांना कॉलेज सोडून केवळ `घर' ताब्यात रहावे म्हणून वडिलांच्या नंतर हे काम करण्याची नामुष्की आली आणि त्यानंतर त्यांनी सफाई कामगारांच्या नरकतुल्य वास्तवाला समाजापुढे मांडण्याचे काम सातत्याने केले. जागतिक किर्तीचे छायाचित्रकार सुधाकर आलवे यांनी या कामगारांच्या दु:खावर, वेदनांवर आणि त्यांच्या प्रत्यक्ष कामाच्या वास्तवावर आधारीत अतिशय प्रभावी काळजाला हालवणारी अशी दाहक

छायाचित्रांची एक भलीमोठी सीरीज `वर्कर' या नावाने पुस्तक रूपाने प्रकाशित करून या कामगारांच्या अमानुष जगण्याला जागतिक पातळीवर वाचा फोडण्याचे काम केले आहे.

या संदर्भात डॉ. सुधीर पवार यांनी गटाराच्या भुयारात काम करणाऱ्या सफाई कामगारांच्या जीवनाचा अभ्यास करून अतिशय धक्कादायक निष्कर्ष पुढे आणले आहेत. या व्यवसायजन्य आजारांचे स्वरूप इतके भीषण आहे की, त्यापुढे इतर कुठलेही रोग मामुली ठरतात. या भुयारातून जो वायू निर्माण होतो त्याच्या परिणामी या कामगारांची फुफ्फुसे निकामी होतात. त्यांचे केस लवकर पांढरे होऊन त्यांना अकालीच वृद्धत्व प्राप्त होते आणि या व्यवसायातील कामगार 50 वर्षांपेक्षा जास्त जगत नाहीत. या कामगारांच्या सुरक्षेसाठी काही करावे, काही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांचे जीवन वाचवावे याचा प्रयत्न ना सरकार करते, ना त्यांच्या युनियन्स. कारण या कामगारांविषयी जातीपूर्वग्रहातून येणारी तुच्छतावृत्ती या सर्व पातळीवर दिसून येते.

उच्चजातीय भारतीय समाजाला या `स्वच्छतेची' इतकी धास्ती आहे की हे `लोक नसतील' तर मग आमच्या स्वच्छतेचे काय? इंग्लड, अमेरिकेत जाणारी ही उच्चजातीय मंडळी तेथे मात्र निमुटपणे सर्व प्रकारची `स्वच्छतेची' कामे करताना दिसतात. कारण तेथील `कामगारांचे' म्हणजे घरकामगारांचे, सफाई कामगारांचे पगार त्यांना परवडणारे नसतात. आपल्याकडे साध्या कारकून स्त्रिया, आपल्या मोलकरणीवर कायम तोंडसुख घेताना दिसतात. कारण त्यांचे श्रम स्वस्त आहेत आणि त्याला प्रतिष्ठा नाही. भारताची फाळणी होऊन जेव्हा पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा पाकिस्तानात `साफसफाई'ची कामे करणारे जे हिंदू–दलित होते त्यांना काहीही त्रास झाला नाही. कारण हे `लोक' जर भारतात निघून गेले असते तर मग साफसफाई कोण करणार? असा प्रश्न त्या समाजासमोर उभा राहिला होता. ज्या दलितांना भारतात सामील होण्याची इच्छा होती, त्यांनाही अटकाव झाला. शेवटी त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दादासाहेब गायकवाडांना पाठवून या लोकांची सुटका केली. त्यामुळे या कामाची किती मोठी `धास्ती' उच्चवर्णीय– वर्गीय समाजाला वाटते हे दिसून येते. त्यामुळे चमकदार छबी निर्माण करण्यासाठी अशा स्वच्छता मोहीमा आखणे आणि त्यासाठी समाजातील गोऱ्यागोमटया, नट–नटयांनी पुढाकार घेणे हे फक्त एका `इव्हेंट'पुरतेच मर्यादित राहते. ते रस्त्यावर फिरायला जातात तेव्हा त्यांना कचरा दिसू नये इतकीच त्यांची इच्छा असते. जोवर यासंदर्भातील मेंदूवरील जाती संस्काराची घनदाट पुटे साफ होत नाहीत तोपर्यंत असल्या मोहिमा आखल्या तरी फरक पडणारनाही. भारतात शोध लागू शकले नाहीत आणि भारत तंत्रज्ञानात मागे राहिला त्याला हीच मानसिकता कारणीभूत आहे. ज्यांनी ज्ञान मिळवायचे त्यांनी श्रम करायचे नाही, श्रमाकडे तुच्छतेने बघायचे आणि जे प्रत्यक्ष काम करतात त्यांना ज्ञान मिळवण्यावर बंदी–त्यामुळे दोघेही पांगळे आणि समाजही पांगळा राहीला. शहरामधून साठणाऱ्या कचऱ्याबद्दल नेहमी आवाज उठवणाऱ्या या वर्गाने सफाई कामगारांच्या जीवनात काही मूलभूत बदल करावेत त्यांची जगण्याची परिस्थिती सुधारावी यासाठी काही केल्याचे आढळत नाही. पण त्यांच्या नावाने खडे फोडायला मात्र हे आघाडीवर असतात.

या पार्श्वभूमीवर आपल्याला मोदींनी, गांधी जयंतीच्या मुहुर्तावर सुरू केलेल्या `स्वच्छता अभियाना'कडे पाहिले पाहिजे. वर म्हटल्याप्रमाणे स्वच्छतेकडे पाहण्याचा आपल्या समाजाचा `जातीग्रस्त' दृष्टीकोन पहाता असली स्वत:ची प्रतिमा उजळ करण्यासाठी आखलेली अभियाने अपयशी ठरणार यात शंका नाही. मात्र नरेंद्र मोदींनी आपली प्रतिमा स्वच्छ करण्याची जी मोहीम सुरू केली आहे त्यात ते यशस्वी होतील. ती मोहीम हाती घेतली ती गांधी जयंतीच्या दिवशी. आणि त्यांनी हातात

झाडू घेतला तो साफसफाईचे काम करणाऱ्या वाल्मिकी समाजाच्या वस्तीत, जेथे गांधीजी रहात आणि साफसफाईचे आणि–श्रम प्रतिष्ठेचे महत्व लोकांना पटवून देण्यासाठी– ते झाडू तर मारीतच पण संडासही साफ करीत असत. मोदींचा गांधीजींच्या पावलावर पाऊल टाकण्याचा हा उद्योग म्हणजे एक मोठा `दांभिकपणा' आहे. ज्या हिंदुत्ववादी धर्मांध विचारसरणीने गांधींसारख्या एका महानायकाला भारतातील `महाव्हीलन' बनवले. त्याच विचारसरणीने प्रेरीत होऊन गोडसेने गांधींवर गोळया झाडल्या, त्यांची हत्या केली, त्याच विचारांचे पाईक गांधी नावाची जपमाळ ओढून आपली प्रतिमा स्वच्छ करण्याचा प्रयत्न करीत आहेत.

भारत ओळखला जातो बुद्ध आणि गांधींचा देश म्हणून. पण अमेरिकेतील भाषणात मोदींनी भारत ओळखला जातो तो साप–सपेरा आणि काळ्या जादूमुळे, असे सांगून आज आमच्या हातात `माऊस' आला आहे आणि भारतीय हा `माऊस' हलवून जगाला हालवीत आहे, असे सांगितले. एकीकडे काँग्रेसने 60 वर्षांत काही केले नाही म्हणायचे आणि दुसरीकडे आमच्या हातात `माऊस' आला आहे. आम्ही प्रगती केली आहे, मंगळावर पोहोचलो आहोत, असे म्हणायचे. हे सगळे काय मोदीच्या सत्ताकाळात घडले आहे काय? असे मोदी म्हणतात त्याप्रमाणे आपला देश जसा साफ–सपेरा आणि काळ्या जादुचा आहे तसा चमत्काराचाही आहे. रामायण, महाभारत, सगळी पुराणे, किंबहुना एकंदर सनातनी वैदिक वाङमय चमत्कारावरच उभे आहे. उदा. कुठल्याही ऋषी–मुनींचा जन्म आईच्या उदरातून झालेला नाही. कारण एकदा आईच्या उदरातून म्हणजे स्त्रीपासून जन्म घेणे `पाप' समजल्यावर हे महान लोक स्त्रीपासून कसे जन्माला येणार? वाल्याचा वाल्मिकी झाल्याचा पण एक `चमत्कार' आहे. आज घडीला आपल्या लोकशाहीने तो चमत्कार करून दाखवला आहे. एक नवा `भारत भाग्य विधाता', देशी–विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आणि त्यांच्या बटीक बनलेल्या प्रसारमाध्यमांनी जन्माला घातला आहे. आणि त्याच्या डोक्यातून या अशा `स्वच्छता अभियाना'सारख्या भंकप योजना पुढे येत आहेत. त्या केवळ स्वत:ची प्रतिमा स्वच्छ करण्याच्या गरजेपोटी.

खरे तर महाराष्ट्राला आणि देशालाही आदर्शवत वाटेल अशी `स्वच्छता' शिकवली ती `गाडगेबाबांनी.' गाडगेबाबांच हे `स्वच्छता अभियान' केवळ कचरा आणि घाण साफ करण्यापुरते नव्हते. तर ते समग्र स्वच्छता अभियान होते. ते जातिव्यवस्थाविरोधी होते. ते अंधश्रद्धाविरोधी होते. एक नितळ आणि शुद्ध माणुसकीच्या भावनेचा गाभा त्यात ओतप्रोत भरलेला होता. कुठलाही स्वार्थ आणि राजकारण त्यामागे नव्हते. गांधीजींनी स्वच्छतेचा मुद्दा जरी जातीय भेदभावाच्या भावनेशी आणि श्रमप्रतिष्ठेशी जोडला असला तरी त्यात गांधींचे `राजकारण' होतेच. ब्रिटीशांच्या `फोडा आणि झोडा' या नितीला जसे मुस्लिम बळी पडले, तसे दलित बळी पडू नयेत आणि स्वातंत्र्य लढयात आणखी गुंतागुंत होऊ नये याची त्यांना काळजी घ्यायची होती. शिवाय हिंदूधर्माच्या चौकटीतच `दलितांचं' काही भलं करावं अशीही भूमिका होती. जातीअंताची किंवा दलित मुक्तीची ही भूमिका नव्हती. दलितांना माणुसकीने वागवावं ही एक दयावादी भूमिका होती. दलितांचा विश्वास मिळवण्याचा मार्ग म्हणजे त्यांना हरिची लेकरं म्हणजे हरिजन म्हणणं, अशी भंपकबाजीपुढे येते.

गांधीजींना दलितांना गरीब बिचारी हरिची लेकरंच ठेवायच होतं. गांधीजींच्या प्रामाणिकपणावर संशय न घेताही ही त्यांची `चलाखी' आपल्या लक्षात येते. त्यांच्या या दृष्टीकोनामुळे उच्च जात–वर्गाच्या मनात दया निर्माण होत असेल पण या जातवर्गाच्या प्रस्थापित व्यवस्थेतील हितसंबंधांना मात्र धोका निर्माण होत नव्हता. जो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंदोलनामुळे निर्माण होत होता. गांधीजींकडे दया होती, पण दलितांच्या हक्कांची लढाई नव्हती आणि या दयेलाही

राजकारणाचे अस्तर होते. गोलमेज परिषदेमध्ये दलितांचा प्रतिनिधी मीच अशी जी गांधींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना डावलणारी भूमिका घेतली त्यात या राजकारणाचे प्रतिबिंब दिसून येते. `साफ–सफाईचे काम मला प्रिय आहे.' `स्वच्छता हे ईश्वराचे दुसरे नाव आहे.' अशी जी चमत्कृतीपूर्ण विधाने गांधीजी करत असत ज्यांना वास्तवात काही अर्थ नव्हता. कारण वास्तव हजार पटीने भीषण होते. या संदर्भात गांधीवादावर टीका करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे `शारीरिक परिश्रमाचे गुणगाण गाणे हे ऐषोआरामात जगणाऱ्या वर्गाचा (जातींचा) अनुराग असतो.' स्वच्छतेचेही तसेच आहे.ज्यांना ती करायची नाही त्यांना तिचे गुणगाण गाणे हे `क्रांतिकारक' वाटणारच. पंतप्रधानपदी आरूढ झाल्यानंतर नरेंद्र मोदींना गांधींच्या `स्वच्छता' मोहिमेचा साक्षात्कार झालेला आहे. हाही एक चमत्कार आहे. पण मोदींचे या साफ सफाईच्या कामाबद्दल आकलन आपण पाहिले की, त्यांची ही `चलाखी' आपल्या लक्षात येते. गुजरातचे मुख्यमंत्री असताना एका साफ–सफाई कामगारांच्या सभेत बोलतांना मोदींनी `सफाई कामगारांना हे काम करताना आपण जनतेची जी सेवा करीत आहोत त्याबद्दल `आध्यात्मिक' आनंद मिळत असावा; नाही तर मग इतर कामे त्यांच्यासाठी असताना त्यांनी या कामासाठी स्वत:ला का वाहून घेतले असते असे विधान केले होते.' यात जातिव्यवस्थेचा चलाख पद्धतीने बचाव केलेला दिसून येतो. कारण जातिव्यवस्थेनेच हे काम त्यांच्यावर `लादलेले' आहे. त्यांनी ते आध्यात्मिक आनंदाने स्विकारलेले नाही. पण ही वस्तुस्थिती दडवून या समूहांनी असाच `आध्यात्मिक आनंद' पिढयान् पिढया घेत रहावा हेच त्यांना सुचवायचे आहे. या संदर्भात थोर नाटककार बर्नाड शॉ यांचे एक वाक्य आठवते जे या `सवर्ण' मानसिकतेवर झगझगित प्रकाश टाकणारे आहे. बर्नाड शॉ यांनी `गोऱ्या लोकांच्या काळ्या लोकांबद्दलच्या मानसिकतेबद्दल एके ठिकाणी म्हटले आहे ` ते (गोरे) काळ्या लोकांना `बूट पॉलिश'शिवाय दुसरी कुठलीही संधी ठेवत नाहीत आणि वर म्हणतात पहा त्यांना (काळया लोकांना) बुट पॉलिशशिवाय दुसरे काहीच येत नाही.' जातिव्यवस्थेने दलित समूहांच्या बाबतीत हेच केले आहे. दलितांच्या गुणवत्तेचे प्रश्न जे उभे करतात ते वरील `गोऱ्या मानसिकते'चे लोक आहेत. म्हणे `नरकतुल्य काम करताना त्यांना आध्यात्मिक आनंद मिळतो.' या प्रश्नाचे असे आकलन असणारा माणूस आज भारतीय लोकशाहीच्या चमत्कारामुळे केवळ 31... मते मिळवून पंतप्रधान झाला आहे आणि तो गांधीजींच्या थाटात आपल्याला स्वच्छतेचा नवा `मंत्र' देत आहे. एखाद्या सामान्य दर्जाच्या अभिनेत्याला अचानक काही कारणामुळे नाटकात–सिनेमात एखाद्या `महापुरूषाचे' पात्र रंगविण्याची संधी मिळते, तेव्हा तो जसा त्या वेषात स्वत:ला महापुरूष समजू लागतो तसे आपल्या मोदीसाहेबांचे झाले आहे. ज्या महागाई, भ्रष्टाचार, बेरोजगारीच्या प्रश्नावर विकासाचा नारा देत मोदींनी सत्ता काबीज केली. त्यावर बोलायला मोदी कबूल नाहीत. त्यामुळे मग अशा `स्वच्छता अभियान'सारख्या चमकदार पण भोंगळ मोहीमा घेऊन जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. सफाई कामगारांचे किंबहुना एकंदरीतच साफ–सफाईचे प्रश्न असे `जातीय' आधारावर सडत ठेवून एका जातीचे जीवन पूर्णपणे नामशेष करणारे वास्तव मूलभूतरित्या जर बदलणार नसेल तर स्वच्छता मोहिमा, ज्यांनी कधी हाती झाडू घेतला नाही त्यांच्यासाठी एक `क्रांतिकारी गोष्ट ठरेल' बाकीशून्यच वाटयाला येईल. यासाठी या कामाचे आधुनिकीकरण करणे हा एक मार्ग आहे. पण सफाई कामगारांचे पूर्ण पुनर्वसन करूनच ते अंमलात आले पाहिजे. नाही तर त्यांना आगीतून–फुफाटयात ढकलल्यासारखेच होईल. दुसरीकडे हे `काम सोडा' अशा पद्धतीची मोहीम आखली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महारवतनामुळे गावची गुलामी करणाऱ्या महार जातीला महार वतने सोडून शहराकडे येण्याचा सल्ला दिला होता. तो त्यांनी पाळला. सफाई कामगारांना आता हेच सांगायची वेळ आली आहे.

कामगारवर्गाचे महान नेते कॉ. लेनिन यांचे एक सुप्रसिद्ध कार्टून आहे. लेनिन पृथ्वीवर झाडू घेऊन उभे आहेत आणि जगभरातील शोषक वर्गाला (राजे–रजवाडे, जमीनदार, धर्मगुरू, भांडवलदार इ.) पृथ्वीवरून झाडूने साफ करून पृथ्वी त्यांच्यापासून मुक्त करीत आहेत. आम्हाला अशा झाडूवाल्यांची गरज आहे. कारण अखेर `सर्व रस्ते अखेरीस लंडनला मिळतात' अशा आशयाची एक म्हण आहे. त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या मुक्तीचा मार्ग हा अखेरीस – `समाजवादी क्रांती'च्या दिशेनेच जातो. तेथे अशा सोंगांना आणि थेरांना थारा नसतो. थोर हिंदी कवी गजानन माधव मुक्तीबोध यांनी त्यांच्या एका कवितेत म्हटले आहे.

`जो है उससे बेहतर चाहिए।

सारी दुनिया साफ करने के लिए

एक मेहतर चाहिए।

कॉ. लेनिन यांच्या कार्टूनला साजेशी ओळ आहे. पृथ्वीतलावरून शोषक वर्गाचा पूर्ण नि:पात करणाऱ्या साफसफाईवाल्याची आपल्याला गरज आहे.

- 'जीवनमार्ग'च्या सौजन्याने

kiranm.subhasht@gmail.com

●●●

# जागतिकीकरणाने सबका विकास?

*सुलभा ब्रह्मे*

विकास खाजाउ राजकारण

गेली 20-22 वर्षे भारतामध्ये जागतिकीकरणामुळे सर्वांपर्यंत विकास पोचणार असा भ्रामक प्रचार, राज्यकर्ते, माध्यमे, तथाकथित विचारवंत, शास्त्रज्ञ आदी सर्व करत आहेत. त्यामुळे जागतिकीकरण स्वागतार्ह आहे अशी अंधश्रद्धा जनमाणसात खोलवर रूजवली गेली आहे. 1991 साली काँग्रेस सरकारने नाणेनिधीचे मोठे कर्ज घेऊन त्यांच्या अटीबरहुकूम खाजाउ (खाजगीकरण– जागतिकीकरण–उदारीकरण) धोरण स्वीकारले. बहुराष्ट्रीय व बडया कंपन्याधार्जिण्या, या धोरणामुळे विस्थापन, बेकारी, महागाई वाढत जाऊन जनतेची ससेहोलपट वाढू लागली. तेव्हा स्वदेशीचा नारा देत भाजप आघाडीने 1999 साली केंद्रीय सत्ता काबीज केली. परंतु सत्तेवर आल्यावर मात्र काँग्रेसपेक्षाही अधिक वेगाने खाउजा धोरण रेटणे चालू ठेवले. त्यामुळे 2004 सालच्या निवडणुकीत भाजप पराभूत होऊन काँग्रेस आघाडी डाव्या पक्षांच्या पाठिंब्याने सत्तेवर आली. डाव्या पक्षांमुळे रोजगार हमी, आदिवासी वनहक्क कायदा अशी काही लोकहितकारी धोरणे अंमलात आणली गेली. परिणामी 2009च्या निवडणुकीत काँग्रेस आघाडीने सत्ता टिकवू शकली. त्यानंतर काँग्रेस आघाडीने खाउजा धोरण रेटणे चालूच ठेवले.

**श्रमिकांचे खच्चीकरण**

नवीन आर्थिक धोरणाखाली बडया कंपन्यांना शासन मोठमोठे जंगलपट्टे बहाल करीत असून आदिवासी मोठया संख्येने निर्वाहसाधने गमावीत आहेत. नवी बंदरे, विमानतळ, पर्यटन केंद्रे, महामार्ग, कारखाने यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन शासन शेतकऱ्यांना देशोधडीला लावत आहे. विस्थापितांचे हे तांडे धरणे, महामार्ग, बंदरे, आलीशान इमारती, उड्डाणपूल अशा महाकाय बांधकाम प्रकल्पांकडे फेकले जात आहेत. ठेकेदारांच्या चाबकाखाली भरडले जात आहेत.

असंघटित क्षेत्रातील असे लाखो कामकरी कमी वेतनात अमानुष पद्धतीने राबवले जात असून त्यांना कोणतेही कायदेशीर संरक्षण व संघटनांचा आधार नाही. असंघटित क्षेत्रातील कामगारांना युनियन्सचे बळ होते. परंतु कामगार कपात व खासगीकरण एवढया वेगाने रेटले जाते आहे की कामगार युनियन्सचे संप–लढे निष्प्रभ बनू लागले आहेत. कामगार–कर्मचारी मोठया संख्येने नोकरी गमावत असताना नव्या पिढीला नोकरी कोठून मिळणार?

खाउजा धोरणाखाली कामगारवर्गाचे असे खच्चीकरण केले जाते आहे. कंत्राटी, हंगामी मजुरांच्या फौजा वाढवल्या जात आहेत. बेकार तरूणांचे तांडे विस्तारले जात आहेत. वाढत्या काळ्या धंद्यात त्यांना गुंतवून भणंग वर्ग वाढवला जात आहे. तसेच झटपट पैशाच्या मागे असलेले मध्यस्थ, दलाल, त्यांचे हस्तक, सेवक असे उपरे. अनुत्पादक, संधीसाधू थर वाढवले जात आहेत. धाकदपटशाचा वापर करून `संरक्षण शुल्क' (Protection Money), कर्जवसुली, राहती जागा खाली करून घेणे यासाठी खंडणी वसूल करण्याकरता राजकीय पुढारी, व्यापारी व कंत्राटदार बाळगत असलेल्या भणंगसेनांचा वेगाने विस्तार चालू आहे. भारतातील या भणंग भांडवलशाही अवस्थेमध्ये इलेक्ट्रॉनिक मीडियाचे मोहजाल, पैशाची धुंदी, शासकीय दमणयंत्रणा व गुंडसेना फोफावत आहेत. आर्थिक अंगाने जसा भणंग वर्ग वाढवला जात आहे तसाच राजकीय, सांस्कृतिक अंगानेही तो पोसला जात आहे. बेकार, दिशाहीन युवकांची दिशाभूल करून या तरूणांची झालेली लाकडे आपल्या चुलीत घालून जात–जमातवाद संघटना आपली पोटे भरत आहेत. जातीय दंगलीच्या होळीत सत्तेची पोळी भाजून घेत आहेत. वाढत्या बेकारीचा, आर्थिक अरिष्टाचा फायदा उठवून जातजमातवादी शक्ती आपली ताकद वाढवत आहेत. साम्राज्यशहांना हे पोषकच आहे. म्हणून ते त्यास खतपाणीही घालत आहेत.

**खासगीकरण**

नवीन आर्थिक धोरणाखाली सार्वजनिक क्षेत्राचे खासगीकरण सरकारने सुरू केले. खनिज तेले, यंत्रसामुग्री, दूरसंचार आदी भरपूर नफा देणाऱ्या उद्योगांच्या समभागांची विक्री अत्यंत कमी किंमतीत मनमानी पद्धतीने करून 20-25 टक्के नफा देणारे उद्योग सरकार नष्ट करत आहे. मोठया नफ्याची हमी देऊन तेल, खाण, वीजनिर्मिती आदी नफेशीर क्षेत्रे खासगी कंपन्यांना बहाल करून सार्वजनिक उद्योग–सेवा डबघाईला आणल्या जात आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा भारतात मुक्त विस्तार सुरू करून त्यांच्याशी स्पर्धेत टिकण्याच्या नावाने भारतीय उद्योग व सेवांमध्ये संगणकीकरण वेगाने रेटले जात आहे. परिणामी सार्वजनिक क्षेत्रातल्या 190 लाख नोकरांपैकी 50 लाखांची कपात संभवते. नवीन भरती तर जवळपास थांबलेलीच आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची ताकद जगडव्याल आहे. तेव्हा टाटांसारखे बडे भारतीय उद्योगही बहुराष्ट्रीय कंपन्यांबरोबर करार करून दुय्यमत्त्व स्वीकारत आहेत. अनेक सहयोगी कंपन्या उत्पादनाच्या कामाऐवजी निव्वळ जुळणीचे काम करत आहेत. मध्यस्थगिरी वाढते आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या माऱ्याखाली, साबण, शीतपेये, कपडे पादत्राणांपासून टेलिफोन मोटारीपर्यंत – भारतातले बडे उद्योग अडचणीत येत आहेत व त्यावर अवलंबून असलेले लहान उद्योग तसेच कारागिरी व गृहोद्योग बंद पडले आहेत. कामगार मोठया संख्येने बेकार होत आहेत.

**2014 मधील लोकसभा निवडणूक**

जागतिकीकरणाच्या तेवीस वर्षांच्या जाचक अंमलामुळे जनतेतील असंतोष व वैफल्यभावना वाढत चालली होती. त्यात भर पडली ती जागतिक मंदीमुळे आर्थिक वाढीच्या दरातील घसरण, वाढत्या महागाई आणि खासगीकरणाच्या धोरणाखाली

कोळसा, लोह, स्पेक्ट्रम आदी देशाची अमूल्य संपत्ती मनमानी पद्धतीने खासगी कंपन्यांना बहाल केल्यामुळे फोफावलेली भ्रष्टाचाराची मोठी प्रकरणे! त्यामुळे काँग्रेसविरोधी वातावरण तापू लागले.

काँग्रेसच्या दिवाळखोरीचा भरपूर फायदा उठवत `विकास' व `सुशासन'याची गाजरे लटकवत भाजपचे नरेंद्र मोदी पंतप्रधानपदाच्या शर्यतीत उतरले. परदेशी–देशी बडया कंपन्यांनी भरमसाठ पैसा पुरवून, प्रसारमाध्यमांतून झंझावती प्रचार करून आणि संघ परिवाराने जात–जमातीचा एक्का वापरून मोदींना सत्तारूढ केले; काँग्रेसच्या गलथान कारभारामुळे महागाई भडकत आहे, मोदींच्या हातात सत्ता आल्यावर त्यांच्या तडफदार कार्यपद्धतीमुळे महागाई आटोक्यात येईल असा प्रचार मोदींनी निवडणूक काळात केला होता. महागाई का वाढते याची कल्पना नसल्याने जनतेची दिशाभूल झाली. पण मोदींची धोरणेही काँग्रेसप्रमाणेच देशी–विदेशी कंपन्यांचे नफे फुगवणारी व खाजगीकरण रेटून रॉकेल, ग्यास, वीज, पाण्याचे दर वाढवणारी असल्याने महागाई वाढतच आहे.

याशिवाय मोदींच्या राजवटीखाली जागतिकीकरणाचे थैमान अधिकच संहारक स्वरूप धारण करत आहे. किरणोत्सारी अणुवीज प्रकल्प, महाकाय औद्योगिक पट्टे, नर्मदेवरील सरदार सरोवर धरणाच्या उंचीत मोठी वाढ, अवास्तव गंगा – कावेरी नदी जोड प्रकल्प अशा अनेक विनाशकारी प्रकल्पांमुळे लाखो भारतीय श्रमिक स्वदेशातच निर्वासित बनवले जाऊन भांडवलाच्या गुलामीच्या गाडयास जुंपले जाणार आहेत. `मोदींचे विकासाचे मॉडेल' म्हणजे साम्राज्यशाहीची हुकूमशाही! भाजपप्रणित बेगडी विकास भारतातील बहुविविधतेवर वरवंटा फिरवून भारतीयत्व नष्ट करू पाहत आहे. शेतकरी व आदिवासी यांचे जीवन उध्वस्त करून लाखो श्रमिकांना देशोधडीला लावून त्यांच्यापुढे `शहरे' म्हणजे `विकास' असे फसवे समीकरण मांडत आणि `स्मार्ट सिटी'ची स्वप्ने रंगवत त्यांना भांडवलाच्यागुलामीत ओढले जाते आहे.

राष्ट्राभिमानाच्या पोकळ फुशारक्या मारत. स्वाभिमान सोडून, जपान व अमेरिका भेटीत, स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेन यासाठी जपानी कंपन्या आणि अमेरिकेतील अनिवासी भारतीय व तेथील बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्यापुढे, मुक्त संचारासाठी, मोदी नतमस्तक! चीनच्या अध्यक्षांच्या भारत भेटीमध्ये विविध क्षेत्रांमधील गुंतवणुकीबाबत चर्चा झाली. चिनी यंत्र उद्योग व अन्य उद्योग भारतात सहयोगी उद्योग म्हणून गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत.

त्यामुळे भरपूर भांडवली गुंतवणूक, पण रोजगार मात्र नगण्य. स्मार्ट सिटी, रेल्वे, महामार्ग, वीजकेंद्रे, कारखाने यामध्ये गुंतवणूक करायची म्हणजे मुबलक जमीन ताब्यात हवी. ही जमीन गावाची म्हणजे शेतकऱ्यांची किंवा जंगलातील म्हणजे आदिवासींची निर्वाह साधने आहेत. त्यांना बळजबरीने हुसकावल्याविना ती बहुराष्ट्रीय कंपन्यांना बहाल कशी करणार? अशा जमीन संपादनाच्या आड येत आहे. 2005 चा आदिवासी व वनवासी जमीन हक्क देणारा वनहक्क कायदा आणि सुधारित जमीन संपादन कायदा. तेव्हा हे दोन्ही कायदे `सुधारण्याचा' (म्हणजे भारतीय जनतेचे कायदेशीर हक्क हिरावून घेण्याचा) मोदी शासनाचा इरादा आहे. परकीय भांडवल गुंतवणुकीबाबत भारतामध्ये अनेक भ्रामक समजुती ठसवलेल्या आहेत. एक, भारतात भांडवलाचा तुटवडा आहे. हे खरे नाही.

करचुकवेगिरी, लांडयालबाडया करून त्या पैशाला काळ्या पैशाचे रूप दिल्याने त्यातून उघड भांडवली गुंतवणूक करता येत नाही आणि हा पैसा जमिनीच्या व मालमत्तेच्या सट्टेबाजी व्यवहारात, रोखे बाजारात, विविध काळया धंद्यात, सोने–चांदी खरीदण्यात अडकला आहे किंवा परदेशाच्या गुप्त खात्यांमध्ये कुजवत ठेवला आहे. हा पैसा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाहून अधिक आहे असा अंदाज आहे.

दुसरा भ्रम म्हणजे परकीय गुंतवणुकीमुळे परकीय चलन उपलब्ध होते. भारतात नफा कमाईसाठी आलेले परकीय भांडवल व्याज, नफा, रॉयल्टी इ. मार्गे परदेशात नेले जाते. परिणामी काही वर्षांतच भांडवलाच्या आयातीपेक्षा परकीय चलनाची गळती वाढते आणि परकीय भांडवलामुळे परकीय चलनाचा नक्त पुरवठा वाढण्याऐवजी त्यामुळे परकीय चलनाची नक्त जावकच होते, आणि देश कर्जाच्या चिखलात खोलखोल रूतत जातो. रिझर्व बँकने परकीय कंपन्यांच्या 1994-95 ते 1996-97 या काळात केलेल्या 268 कंपन्यांच्या अभ्यासातून हेच दिसून येते. या कंपन्यांनी या तीन वर्षात 157 अब्ज रूपये परकीय चलन मिळविले व 208 अब्ज रूपये आयात, नफा, रॉयल्टी इ. मार्गे परदेशी पाठवले. म्हणजे ऐन जावक 51 अब्ज रूपयांची झाली. तीन वर्षातच ही रक्कम त्यांनी भारतात आणलेल्या भांडवलाच्या तिप्पट होती. यावरून परकीय भांडवलाद्वारा केवढी लूट केली जाते हे लक्षात येते.

तिसरा भ्रम, रोजगार निर्मिती होते. परकीय कंपन्या वापरतात ते तंत्रज्ञान अतिभांडवलप्रधान असल्याने रोजगार निर्मिती अल्पच होते. पण त्यासाठी शेतजमीन, जंगलजमीन बळकावली जाते. त्यामुळे शेतकरी, आदिवासी बेकार हेऊन नक्त रोजगारात घटच होते. शिवाय निसर्गसंपत्तीचा विध्वंस होतो तो वेगळाच! आलीशान शहरे, सुपरमहामार्ग, रेल्वेमार्ग, विमानतळ, बंदरे यासाठी लाखो हेक्टर जमीन संपादन केली जात आहे. प्रचंड बांधकामासाठी डोंगर भुईसपाट करून डबर आणि खडी, नद्या खरवडून वाळू, शेतजमीन उकरून विटा, जंगले समूळ नष्ट करून लाकूड पुरवठा आणि खाणकामातून कोळसा, लोह आदी खनिजसंपत्ती संपुष्टात आणली जात आहे. भूगर्भातले पाणी आटवून आणि शेतीचे पाणी पळवून `स्मार्ट सिटी'ना पाणीपुरवठा, लाखोंचे विस्थापन असा प्रचंड विध्वंस करीत बडया कंपन्यांच्या थैल्या भरणार, धनिकांचा ऐशआराम चैनचंगळ पोसली जाणार आहे. याला बिरूद मात्र सबका विकास!

- 'जीवनमार्ग'च्या सौजन्याने

sulabhabrahme2013@gmail.com;

●●●

# आत्मा आणि मानवी मेंदू

*य.ना.वालावलकर*

तत्वज्ञान इतिहास

*इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः। मनसस्तु परा बुद्धिः यो बुद्धेः परतस्तु सः।*

(गीता अ. 3 श्लोक. 42)

गीतेतील या श्लोकात इंद्रिये (ज्ञानेंद्रिये+कर्मेंद्रिये), मन आणि बुद्धी यांचा उल्लेख आहे. मात्र बुद्धीचे तसेच मनाचेही अधिष्ठान असलेल्या मेंदूचा उल्लेख नाही. संपूर्ण गीतेत मेंदू अथवा त्या अर्थाचा अन्य कोणताही शब्द नाही. संस्कृत-मराठी "गीर्वाणलघुकोशा"त मेंदू हा शब्द नाही. पुढे शोध घेता लक्षात आले की आपण आज ज्या अर्थाने मेंदू हा शब्द वापरतो त्या अर्थाचा एकही शब्द वेद, उपनिषदे, गीता यांत नाही. एवढेच नव्हे तर तो बायबलात नाही, कुराणात नाही, कुठल्याही धर्मग्रंथात नाही. ज्ञानेश्वरीत नाही, अन्य संतसाहित्यात नाही. मेंदूच्या कार्याविषयीं माणसाला झालेले ज्ञान अगदी अलिकडचे म्हणजे गेल्या दोन शतकांतील आहे.

याचा अर्थ असा नव्हे की डोक्याच्या कवटीत सुरक्षितपणे असलेला मेंदू हा अवयव प्राचीनकाळी ठाऊक नव्हता. यज्ञात

अनेक पशू बळी देत. तसेच मांसाहारासाठी बोकड, बैल, गाय असे पशू कापीत. तेव्हा पशूंचे सर्व अवयव वेदकालीन माणसाला ज्ञात होते. हाडात जसा पांढरा-पिवळा मगज असतो तसा प्राण्यांच्या डोक्याच्या कवटीत फिकट गुलाबी-राखी रंगाचा मगज असतो. माणसाच्या डोक्यातही तसा असणार  एवढे त्याकाळी कळत होते. पण त्याच्या कार्याविषयी काहीच कल्पना माणसाला नव्हती. शरीरातील सर्व क्रिया नियंत्रित करण्याची यंत्रणा त्या गुलबट रंगाच्या मगजात आहे याची कल्पना त्याकाळी जगात कुणालाच नव्हती. ते ज्ञान अगदी अलिकडचे आहे. माणसाच्या स्मृती, ज्ञान, मन, बुद्धी  यांचे स्थान हृदयात आहे अशी पूर्वी सर्वांची समजूत होती. कारण हृदयाची धडधड कळत होती. ती थांबली की मृत्यू येतो हे दिसत होते.

माणसाची कर्मेंद्रिये कोणती, ज्ञानेंद्रिये कोणती, प्रत्येक इंद्रियाचे काम काय हे सहज समजत होते. पण इंद्रियांनी आपापली कामे करावी म्हणून त्यांना कोण प्रवृत्त करतो? ज्ञानेंद्रियांद्वारे झालेले ज्ञान नेमके कोणाला होते? ज्ञाता कोण? हे समजत नव्हते.  डोळ्यांनी एक वस्तु पाहिली. ती सोनचाफ्याची कळी आहे हे आपल्याला  समजले. वस्तूचे रूप आणि नाव यांची सांगड घातलेली ही स्मृती शरीरात कुठे साठविलेली असते? एक आवाज कानांनी ऐकला. त्यावरून सापाने तोंडात बेडूक पकडला आहे हे हे पूर्वानुभवामुळे कळले. नाकाद्वारे सुगंध आला. बकुळीच्या फुलांची आठवण झाली. हे सगळे कसे घडते? कोण घडवते?

केनोपनिषदात शिष्य गुरूंना विचारतोः

> लोक ज्या वाणीने बोलतात त्या वाणीला बोलण्यास कोण प्रवृत्त करतो? डोळ्यांना आणि कानांना त्या त्या कामासाठी कोण नियुक्त करतो?
>
> ऐतरेय उपनिषदात आहे:--
>
> ज्याच्यामुळे माणूस (नेत्रांद्वारे) पाहातो, (कर्णाद्वारे) ऐकतो, (नाकाद्वारे) वास घेतो, वाचेद्वारे स्पष्ट बोलतो, (रसनेद्वारे) चविष्ट-बेचव जाणतो तो आत्मा कोण आहे?
>
> या प्रश्नाचे उत्तर, "तो हृदयस्थ आत्मा परमात्म्याचा अंश आहे." असे तिथे दिले आहे. (उपनिषदातील या प्रश्नाचे खरे उत्तर आत्मा असे नसून  निश्चितपणे मेंदू असे आहे हे आपण आज जाणतो.)
>
> त्याच उपनिषदात पुढे,
>
> *संज्ञानं (सम्यक ज्ञान), आज्ञानं (आदेश देण्याची शक्ती),विज्ञानं (विभिन्न रूपांवरून वस्तू ओळखण्याची क्षमता), प्रज्ञानं (तात्काळ जाणण्याची शक्ती), मेधा, दृष्टि, धृतिः, मतिः, मनीषा(मनन करण्याची शक्ती), स्मृतिः, संकल्पः, क्रतुः(मनोरथ शक्ती), असुः(प्राणशक्ती) , कामः एतानि सर्वाणि प्रज्ञानस्य एव(जीवात्म्याचीच) नामधेयानि।(नावे आहेत.)*

अशी प्रश्नोत्तरे  उद्भवण्याचे कारण म्हणजे मेंदूच्या कार्याविषयीं असलेली त्या काळच्या माणसाची अनभिज्ञता. अन्य सर्व इंद्रियांची कामे कोणती ते स्पष्टपणे कळत होते. जसे डोळ्यांचे कार्य पाहाणे, कानांचे काम ऐकणे, नाकाचे वास घेणे हे सहज समजते.  पण डोक्याच्या कवटीत आहे ते काय? त्याचे कार्य कोणते? याची काहीच कल्पना नव्हती. ज्यात शंभर अब्ज मज्जा पेशी आहेत असा माणसाचा मेंदू म्हणजे जगातले सर्वांत विस्मयकारक, व्यामिश्र (गुंतागुंतीचे), समजण्यास  गहनतम असे विद्युत् -रासायनिक यंत्र आहे. माणसाच्या शारीरिक, वैचारिक, मानसिक, भावनिक अशा सर्व कृतींचे नियंत्रण मेंदू करतो. हे गेल्या शंभर- दिडशे वर्षांत समजले आहे. उपनिषद् काळात मेंदू विषयीचे हे कोणतेच ज्ञान नसणे स्वाभाविक  आहे.

पण माणसाला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे त्याला हवी असतात. शिष्यांनी विचारलेल्या अशा प्रश्नांवर गुरू चिंतन करतात. इंद्रिये आपापली कामे करतात त्यासाठी त्यांना कोण प्रवृत्त करतो? कोण आज्ञा देतो? इंद्रिये, मन, बुद्धी यांच्यावर नियंत्रण ठेवणारा कोणीतरी शरीरात असला पाहिजे असे त्यांना वाटत होते. वस्तूचे नाव आणि तिचे रूप-गंधादि गुणधर्म यांची सांगड घालून ती स्मृती शरीरात कुठे, कशी नोंदविलेली असते? सर्वव्यापी ब्रह्मापासून विश्वाची निर्मिती झाली हे सर्व उपनिषद्‌कार मानत होते. त्या ब्रह्माचा अंश माणसाच्या शरीरात असणार हे स्वाभाविकपणे तर्कसंगत वाटले असावे. म्हणून त्यांनी तशी कल्पना केली. शरीरांतील त्या मानीव ब्रह्मांशाला आत्मा असे नाव दिले. सर्वव्यापी ब्रह्म आणि शरीरस्थ ब्रह्म यांतील भेद स्पष्ट होण्याकरिता सर्वव्यापीसाठी परब्रह्म, परमात्मा, परमपुरुष, शिवात्मा तर शरीरस्थासाठी ब्रह्म, आत्मा, जीवात्मा, अंतरात्मा, देही असे शब्द रूढ झाले. हा आत्मा हृदयात असतो हेही सर्वमान्य झाले.

*अंगठ्याएवढा असलेला अंतरात्मा पुरुष नेहमी माणसाच्या हृदयात स्थित असतो.मी सर्वांच्या हृदयात सामावलो आहे. स्मृती, ज्ञान, चिकित्सक वृत्ती, चर्चा करून तर्कशुद्ध निष्कर्ष काढण्याची क्षमता(अपोहन), यांचा उद्भव माझ्यातून आहे.*

(अ.15,श्लोक.15)

गीतेतील या श्लोकात उल्लेख असलेल्या स्मृती, ज्ञान आणि चिकित्सक वृत्ती या तीनही गोष्टी मेंदूत उद्भवतात हे आज आपण निर्विवादपणे जाणतो. यावरून आजच्या मेंदूला प्राचीन काळचे ऋषी आत्मा मानीत होते असे दिसते.

*हा जीवात्मा कान, डोळे, स्पर्शेन्द्रिय -त्वचा-, जिव्हा आणि घ्राणेंद्रिय –नाक - तसेच अंत:करण ह्यांच्या आश्रयाने (द्वारे) विषयांचा उपभोग घेतो.*

(गीता अ.15,श्लोक.9)

*अन्नाच्या पचनासाठी लागणाऱ्या सर्व क्रिया मेंदू नियंत्रित करतो. कोणते पाचकरस केव्हा स्रवावे याचे आदेश मेंदू देतो.*

(गीता अ.15,श्लो.14)

यावरून गीतेतील अहं (श्रीकृष्ण) म्हणजे मेंदूच असावा हे स्पष्ट आहे.

प्रश्नोपनिषदात गार्ग्य मुनींनी विचारलेल्या प्रश्नाला महर्षी पिप्पलाद यांनी दिलेल्या उत्तरामधूनही ही संकल्पना स्पष्ट होते.

*हा जो पाहाणारा, स्पर्श करणारा, ऐकणारा, हुंगणारा, तसेच (इंद्रियांद्वारे) कार्य करणारा विज्ञानात्मा, जीवात्मा आहे, तो अविनाशी अशा परमात्म्यात स्थित आहे. आज आपल्याला निश्चितपणे ठावूक आहे की हे सर्व करणारा मेंदू आहे.*

*हे गार्ग्य ! अस्ताला जाणाऱ्या सूर्याची सर्व किरणे जशी त्याच्या तेजोमंडलाच्या ठिकाणी एकवटतात आणि सूर्योदय झाल्यावर ती सूर्यबिंबातून पुन्हा फाकतात.*

यावरून उपनिषद् काळातील ज्ञानमर्यादा समजते.

(झोपेत असताना माणसाचा) *तो सर्व ज्ञानेंद्रियसमुदाय मनाच्याठिकाणी विलीन होतो. त्यामुळे हा जीवात्मा*

*कांही ऐकत नाही. पाहात नाही. कशाचा वास घेत नाही. स्वाद घेत नाही. त्याला स्पर्श जाणवत नाही. अशावेळी तो झोपला आहे असे लोक म्हणतात.*

*या स्वप्नावस्थेत हा जीवात्मा आपल्या विभूतीचा* (सर्वव्यापीपणाचा, सर्वसाक्षीपणाचा) *अनुभव घेतो. जे अनेकदा पाहिले आहे ते पुनःपुन्हा पाहातो. जे अनेकदा ऐकले आहे ते पुनश्च ऐकतो. नाना देशांतील आणि अष्टदिशांतील अनुभवलेल्या विषयांचा पुनःप्रत्यय घेतो. इतकेच नव्हे तर पाहिलेले आणि न पाहिलेले, ऐकलेले आणि कधीही न ऐकलेले , अनुभवलेले आणि कधीही न अनुभवलेले, अस्तित्वात असलेले तसेच अस्तित्वात नसलेलेसुद्धा स्वप्नात पाहातो. म्हणजे* (निजल्याजागी) *आपणच सर्व होतो आणि आपणच पाहातो.*

आज आपण जाणतो की स्वप्नावस्थेतील आत्म्याचे हे वर्णन मानवी मेंदूला शत-प्रतिशत (100%) लागू पडते. त्याकाळी उपनिषद् कारांनी स्वप्नांचा किती सूक्ष्म आणि सखोल अभ्यास केला होता हे लक्षात येते. खरे तर तो विचार त्यांच्या मेंदूनेच केला. पण स्वप्ने पाहाणारा हृदयस्थ आत्मा नसून मी मेंदू म्हणजे तुमच्या डोक्याच्या कवटीत असलेला गुलबट रंगाचा मगज आहे याची जाणीव त्यांना होऊ दिली नाही. त्याकाळी ते समजणे शक्यही नव्हते. आता साडेतीन सहस्र वर्षांनंतर त्यांच्या वंशजांना (म्हणजे आपल्याला) ते समजले.

* * *

असे हे उल्लेख उपनिषदांत तसेच गीतेत आहेत. इथे हृदय हे स्थान सोडून अन्य बहुतेक गोष्टी मेंदूला लागू पडतात हे आपल्याला आज समजते.

पुढे या काल्पनिक आत्म्याच्या पायावर पुनर्जन्म, संचित, प्रारब्ध, स्वर्ग, आत्म्याचा अर्चिरादि मार्गांनी प्रवास, मोक्ष, मोक्षप्राप्तीचे विविध मार्ग, जन्ममृत्यूचे फेरे, चौऱ्याऐंशी लक्ष योनी अशा अनेकानेक भ्रामक संकल्पनांचे बहुमजली डोलारे उभे राहिले. वस्तुत: हे सगळे माणसाच्या मेंदूनेच निर्माण केले."तुम्ही ज्याला शोधत आहात तो कर्ता-करविता मी आहे." याचा थांगपत्ता त्याने दीर्घकाळ लागू दिला नाही. त्याच्या आज्ञेनेच तर सगळे घडत होते. पण ते त्याचे त्यालाच ठाऊक नव्हते. मग थांगपत्ता कोण, कोणाला, कसा सांगणार?

"आत्मा वा अरे द्रष्टव्य:,श्रोतव्य:,मन्तव्य:, निदिध्यासितव्य:।

(बृहदारण्यक उपनिषद)

*अरे बाबांनो! आत्मा म्हणजे काय ते पाहायला हवे. त्याविषयी ऐकायला हवे. त्यावर मनन, चिंतन करायला हवे. आत्म्याचा सतत ध्यास घ्यायला हवा. तरच आत्मा म्हणजे काय ते थोडे-फार समजेल .*

जणू या औपनिषदिक उपदेशानुसार आधुनिक वैज्ञानिकांनी मेंदूविषयी सतत संशोधन केले आणि मेंदुविज्ञानात मोठी प्रगती झाली. आज जगभरात सर्वाधिक संशोधन मेंदू या विषयावर होत आहे. मानवी मेंदू म्हणजेच उपनिषदांतील आत्मा हे आता समजू लागले आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

अशी आहे ही जाणिवेची जाणीव असलेल्या (पण बरेचदा कुठल्या कुठे भरकटणाऱ्या) होमो सेपियन सेपियनची गंम्मत! म्हणजे अब्जावधी मज्जापेशींनी बनलेल्या त्याच्या मेंदूची मज्जा!

ynwala@gmail.com

# जेत

*नंदा खरे/पद्मजा फाटक*

*आदरांजली*

पद्मजा फाटक वारल्या. अनेक व्याधी, 'रोपण' केलेले मूत्रपिंड, त्या मूत्रपिंडाला शरीराने स्वीकारावे यासाठीची औषधयोजना, त्या औषधांचे दुष्परिणाम टाळायला (किंवा सौम्य करायला) आणखी औषधयोजना; अशा साऱ्यांशी बावीस–तेवीस वर्षे झगडून सत्तरच्या वयात ६ डिसेंबर २०१४ ला पद्मजांनी 'देह ठेवला.'

'आजचा सुधारक' आणि त्यांचा जुना स्नेह. दि. य. देशपांडे, प्र. ब. कुलकर्णी, मी, साऱ्यांशी तसाच जुना स्नेह.

शिक्षणाने समाजशास्त्रज्ञ असलेल्या पद्मजांना खरे तर कोणताच विषय वर्ज्य नव्हता. 'शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक' आणि (माधव नेरूरकरांसोबतचे) 'बाराला दहा कमी' ही त्यांच्या ग्रंथसंपदेतली रत्ने.

ताराबाई मोडक पद्मजांच्या आजी. त्यांचे वादळी व्यक्तिगत आयुष्य; आणि शिक्षणक्षेत्रातली अत्यंत सर्जकतेने, निष्ठेने केलेली कामगिरी; या दोन्हींना पूर्ण न्याय देत पद्मजांनी सुंदर चरित्र रेखाटले.

अणुविज्ञान आणि अणुबाँबचे तंत्रज्ञान हा विसाव्या शतकातला महत्त्वाचा मानवी व्यवहार खूप सहृदयतेने पद्मजांनी तपासला. एकीकडे माणसाची ज्ञानलालसा आणि दुसरीकडे ज्ञानवापरातले नैतिकतेचे प्रश्न, यांतले ताणतणाव त्यांनी अत्यंत सुरस आणि वाचनीय रूपात वाचकांपुढे मांडले.

पण पद्मजांचा मूळ पिंड ललितलेखांचा. पण हे जागाभरू, फुरसतीच्या काळात वाचायचे लेख नव्हेत. सज्जड प्रश्न विचारणे, ज्ञानपिपासा आणि तिचे शमन वाचकापुढे मांडणे, हा पद्मजांचा लक्षणगुण. खरे तर १९७५–९० या काळातल्या विवेकी, विचारी, सुशिक्षित मध्यमवर्गाच्या बौद्धिक कमाईचा आलेख रेखत, त्या वर्गाचे प्रश्न त्यांच्यातर्फे मांडत पद्मजा वावरत होत्या. त्यांच्या मनांतल्या, विचारांतल्या उत्कृष्ट अंगाला पद्मजा भिडत होत्या.

हो, त्या ब्राह्मणी संस्कृतीतून आलेल्या होत्या. पण त्या संस्कृतीने एकूण मराठी–भारतीय समाजाला खूप काही दिले आहे. म्हणूनच त्या, "हो, प्रश्न साडेतीन टक्क्यांचा (ब्राह्मणांचा!) आहे, पण म्हणून काय त्या प्रश्नानं असूच नये?" असे न लाजता विचारत असत. जातिभेदाला संपवू पाहणाऱ्यांमध्ये जी 'रिव्हर्स स्नॉबरी' असते, उच्चवर्णी ते सगळेच निरर्थक किंवा घातक, असा अविवेकी भाव असतो, त्याला पद्मजा सक्षम उत्तर देत असत. म्हणूनच त्यांच्या, त्यांच्या लिखाणाच्या चाहत्यांमध्ये वा. वि. भट (त्यांच्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशक), ग्रंथाली परिवार (ज्या पुरोगामी गटाला पद्मजांचे एकही पुस्तक काढता आले नाही!) इथपासून ते श्री. पु. भागवत (साहित्यातल्या उच्चवर्णीयांचे मेरुमणी) यांसारखे विविधरंगी लोक आहेत.

त्यांच्या लेखनाची सात्त्विक, वाचनीय, सहृदय वृत्ती अधोरेखित करणारा उतारा खाली देत आहोत. (सोनेलुमियेर, सुपर्ण प्रकाशन, पुणे, 'शिक्षण' या लेखातून)

*थोडाफार ॲब्स्ट्रेक्ट विचार करता यायला लागल्यापासून मला सतत एक प्रकारची अनिश्चितता, असुरक्षितता वाटत असायची आणि हा भांबावलेपणा खूप वर्षं टिकून होता. जणू मला कुणी तरी डोळे बांधून या नव्या परिसरात जाणून सोडलेलं असावं तशी भोवतालची बरीच नावं, पाट्या, संस्था आणि संबंध मला अनोळखी वाटायचे.कुठे एखाद्या रात्रीपुरता मुक्काम करायची वेळ आली तरी आपण त्या घराचा – निदान खोलीचा – किमान भूगोल माहीत करून घेतो आणि मला तर जन्मभर ज्या पाण्यात सपासप हात मारायचे होते त्याचं कांपोझिशनही समजत नव्हतं.*

*हे आपले वडील. हे सरकारी हायस्कूलचे प्रिन्सीपॉल आहेत तर सरकारी म्हणजे नक्की काय? वाटेत लागणारा तो नळ, म्युनिसिपालिटीचा–म्युनिसिपालिटी म्हणजे नक्की काय? आईला सारखं 'मर्जरङ्ग' झालं म्हणून वाईट वाटत असतं. ते वाटणं म्हणजे नक्की काय? आपला मामा मुंबईला 'एशिया एलेक्ट्रिक' मध्ये आहे, हे जे आपण कुणी विचारलं तर सांगता यायला हवं म्हणून लक्षात ठेवलंय, ते तरी? आणि त्याच्या घरी निळ्या, निळ्या ज्योतींचा 'गॅस' असतो तो?*

*थोडक्यात म्हणजे आपल्या भोवताली हे सगळं काय चाललंय काय?*

*प्रश्न अनंत होते आणि त्यातले बहुतेक भौतिक होते. आणि बाकीची सगळी माणसं पाहिली तर ती याच अनाकलनीय जगात–जणू इथेच जन्मल्यासारखी–बिंधास्तपणानं वावरत असायची!*

*माझा बुद्धिप्रवास सुरू झाला तो भोवताल समजून घेण्याच्या या टोकाच्या गरजेतून, रोकड्या उपयुक्तवादातून – विशुद्ध ज्ञानलालसेतून नव्हे.*

आमची, माझी मैत्रीण गेली. आम्हाला, मला दरिद्री करून गेली. पण तिची गप्पिष्ट, प्रेमळ विवेकी वृत्ती जिवंत राहीलच. माणूसप्राणी खूप लवचीक, शहाणा, टिकावू आहे! त्याला जगाकडे मजेत पाहणे आवडते. आणि पद्मजांचे तर स्वतः निवडलेले नावच 'मजेत' असे होते!

vidya_nand@hotmail.com

●●●

# कुटुंबसंस्था: काही प्रश्न

*छाया दातार*

युवा महिला जीवन शैली

आजचा तरूण अस्वस्थ आहे, असंतुष्ट आहे. बेभान आहे, बेदरकार आहे, बेजबाबदार आहे हिसंक आहे, विध्वंसक आहे. त्याला कोणतीही बंधने नकोत. त्याला मुक्ती हवी आहे पण ही अराजकवादी मुक्ती आहे. हा बेबंदपणा आहे. हे आजच्या समाजशास्त्रज्ञांचे तरूणाचे विश्लेषण आणि हा राज्यकर्त्याच्या, त्याच बरोबर आईवडिलांच्या डोक्याच्या काळजीचा विषय. उपाय अनेक सुचविले जातात, तरूणांना विधायक कार्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. खेड्यात पाठविले पाहिजे. त्यांची उसळती युवाशक्ती सृजनासाठी वापरली पाहीजे. तरूणांने राजकारणात पडू नये सरकारी पातळीवर विद्यापीठातून ह्या युवाशक्तीला बांध घालण्याचे प्रयत्न होतात. आईवडिलाकंडून पैशाच्या नाड्या आवळण्याचा प्रयत्न होतो. मुले आईवडिलांना जुमानत नाहीत. ' जनरेशन गॅप' (पिढ्यामंधील अंतर) वाढते आहे का? अशा चिंतेच्या सुरांमध्ये परिसंवाद होतात. कुटुंबांचा पूर्वीचा सुरळीतपणे चालणारा गाडा आता कुरकुरू लागला आहे याची सर्वांना जाणीव होते. आणि आजचा तरूण असा अस्वस्थ का याच्या कारणांचा शोध घेता घेता दोन ठिकाणी त्याची मुळे रूजली असल्याची पक्की खात्री पटते. शिक्षणव्यवस्था बदलली पाहिजे, शिक्षणातून संस्कार चांगले झाले पाहिजेत. आणि कुटुंबजीवन सुधारले पाहिजे. माणसाच्या मनावर पहिले घाव बसतात ते येथेच.

कुटुंब व्यवस्था आदर्श असली पाहिजे. मुलांची मने तेथे घडविली जातात असे आमचे समाजशास्त्र टाहो फोडून सांगतात. प्रत्यक्ष कुंटुबात मात्र वेगळे चित्र दिसते. बाहेर लोकशाहीचा आदर्श सांगणारी समाज व्यवस्था कुटुंबात मात्र

'वडिलांचे आज्ञापालन करावे' असा उपदेश करून मुलांची मने वडिलांच्या भीतीने खुरटी ठेवण्याचा प्रयत्न करते. व्यक्तिस्वांतत्र्याचे नारे दिले जात असताना घरात मात्र 'बाई ग तुझे स्थान चुलीजवळ!' या मंत्राने स्त्रियांची गुलामी जोपासली जाते. ' सचोटिने वागावे' या उपदेशाचा मंत्र जपत घरात मात्र वडिलांच्या मृत्यु मागे संपत्तीचा मोठ्यात मोठा हडप करण्यासाठी भावाभावात स्पर्धा लागते. पुरूष ब्रम्हचारी राहिला तर त्यांचे कौतुक होते. अविवाहित स्त्रीला समाज वाळीत टाकते. स्त्रीचा देवता म्हणून आम्ही सन्मान करतो असे अभिमानाने सांगत घरोघरी स्त्रीला दासीहूनही क्षुद्र पातळीवर वागविले जाते. एकीकडे प्रत्येकाने आवडीचा व्यवसाय निवडावा असे म्हणत वडिलांच्या आवडीचा व्यवसाय निवडावा अशी त्याची फलनिष्पत्ती होते. कारण आर्थिक ताबा त्यांचा असतो. पैसे या निकषावर सर्व काही तोलले जाते. तारूण्य हा जीवनाचा अतिरम्य, रोमँटिक काळ म्हणून कवितातून महती गायली जाते. प्रत्यक्ष कॉलेजमध्ये मात्र तरूणतरूणींची स्वच्छ मोकळी मैत्री नाक मुरूडून पाहिली जाते. तरूणां–मध्ये धडाडी, पुढारीपंणा, औद्योगिक वृत्ती जोपासली पाहिजे म्हणता म्हणता घरात मात्र 'तुला काय कळतय! आमचे अनूभवाचे बोल ऐक.' या दडपणाखाली पुढे पाऊल टाकायला बंदी केली जाते. आत्मसन्मान ठेवावा, लाथ मारीन तेथे पाणी काढीन अशी वृत्ती बाळगावी हे सुभाषित पाठ करून घेता घेताच प्रत्यक्षात मात्र लाचारी, ढोंगीपणा याच गुणावर माणसे यशस्वी होताना दिसतात. 'जाती व्यवस्था मोडली पाहिजे या उपदेशाचे ढोल ऐकता ऐकताच घरीदारी जातीबाहेर लग्न केलेल्या व्यक्तिला टोचे मारून रक्तबंबाळ करणारी वडिलधारी मंडळी दृष्टिस पडतात. आणि आजचा संवेदनाशील माणूस विषण्ण होतो. सुभाषिते आणि प्रत्यक्ष व्यवहार यांच्यामधील दरीचा अर्थ काय? माणूस असा का वागतो? असे अनेक प्रश्न त्याला पडतात. माणसाचे व्यक्तिमत्व घडते तरी कसे? एकीकडे या सगळ्या दाभिंकतेवरूध्द बंड करावे असा आकांन्त करणारी व्यक्ती पुन्हा या समाजात सामिल होऊन तेच दाभिंक जीवन कसे जगते? या प्रश्नांची उत्तरे पहाण्यासाठी सगळे जीवनच तपासून पाहायला पाहिजे, असा प्रयत्न क्वचितच होताना दिसतो. या दाभिंकतेने वैतागलेला तरूण पुष्कळदा हे सामाजिक जीवनच नाकारतो समाज म्हणजे बंधने ह्या बंधनांचा धिक्कार करताना तो समाज–संघटनाचाच धिक्कार करतो. प्रदूषित झालेल्या प्रकाशापेक्षा अंधाराला कवटाळतो. अशी नकारात्मक भूमिका घेऊन उत्तरे सापडत नसतात. आपण माणूस आहोत. इतर प्राणीमात्रापेक्षा श्रेष्ठ आहोत. माणसाचे जीवन हे केवळ निसर्गाने नियम केलेल्या चौकटीत न होता माणसाच्या जाणीवपूर्वक कृतीतून घडत जाते आणि म्हणूनच माणसाचे जीवन माणसाला बदलती येते. माणूस हा समाजातच राहू शकतो. सामाजिक श्रम हो त्याच्या अस्तित्वाची अट असते. आणि म्हणूनच सामाजिक बंधने ही सामाजिक सुखाचे कोंदण असते. ह्या सुखाच्या व स्वातंत्र्याच्या कक्षा रूंदावताना जुन्या बंधनाचे कोंदण गळून पडते आणि हे जाणिवपूर्वक करता येते. हे भान येणे म्हणजे मानवी सामर्थ्याची ओळख पटणे. याचीच पुढची पायरी अभ्यास.

**जीवनाची तीन क्षेत्रे**

व्यक्तीचे जीवन हे साधारण तीन ठिकाणी विभागलेले असते (1) कुटुंब जीवन, (2) कार्य जीवन, (3) आणि या दोघांच्याव्यतिरिक्त उरलेले मैत्री जीवन.

(1) कुटुंबातील माणसामाणसांचे संबंध हे रक्ताच्या नात्याने बांधले असतात. त्यामध्ये एकप्रकारची अपरिहार्यता असते. तशीच सास्कृंतिक सुरक्षितता असते. पूर्वीच्या टोळी जीवनाचा हा एक प्रगत प्रकार म्हणता येतो. कोणत्या कुटुंबात माणसाचा

जन्म होतो या घटनेने माणसाच्या आयुष्यातील अनेक चाकोऱ्या जन्म जात ठरून जातात. कुटुंब हे पहिली लक्ष्मण रेषा आखते, पहिले कुपंण येथेच भेटते.

(2) कार्यजीवन हे माणसाच्या आयुष्यातील सर्वात महत्वाचे अंग. स्वत:च्या अंगच्या सामर्थ्याची क्लपना त्याला येथेच जाणवते. येथील पायरीवर पाय ठेवूनच त्याचा सामाजिक व्यवहारात प्रवेश होतो. शिडीच्या कितव्या पायरीवरुन सुरूवात होते याला उत्पादन व्यवहारात महत्व असते. त्याचे तर माणसांशी संबंध निश्चित होतात. तो कामगार असेल तर तो शोषित वर्गात जातो कारखानदार असेल तर शोषक वर्गात जातो. त्यांचे हितसंबध गोठले जातात. त्यानुसार जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन तयार होतो. तर्कपधदती, गृहितकृत्ये थोडक्यात कल्पना प्रणाली तयार होते. सुभाषितांचा काळ जाऊन व्यवहाराचा काळ येतो. आणि मन लवचिक बनू लागते.

(3) क्लबमध्ये जाऊन पत्ते खेळण्यापासून ते नाक्यावर उभे राहून वासूगिरी करणे किंवा मित्रांच्या घोळक्यात पानपट्टीवाल्याचा रेडिओ ऐकणे हे मैत्री जीवन. येथे कुंटुबजीवन व कार्यजीवन यामध्ये आढळणारी शिस्तशीर रचना नसते. त्यामुळे येथे पुष्कळसा सैलपणा असतो. दोन्ही ठिकाणी असणाऱ्या दमनाचा येथे अभाव असतो. येथील मानवाचे संबंध बऱ्याच प्रमाणात निवडलेले असतात. आणि कुटुंबजीवन व कार्यजीवन या दोन्ही ठिकाणी न मिळालेला जिव्हाळा येथे मिळू शकतो. स्पर्धेची भावना तीव्र नसते. बेछूटपणा, बेदरकारपणा यांना वाव मिळतो. व दोन्ही ठिकाणी जाचक वाटलेली पण टाळता न येणारी शिस्त व बंधने झुगारून देऊन काहीशा चिकित्सक दृष्टीकोनातून समाजाकडे पाहण्याचे धैर्य मिळू शकते. किंवा काही वेळा चक्क जीवनापासून पळण्याचा व दारूमध्ये दु:ख बुडविण्याचा प्रकारही घडू शकते अर्थात पुन्हा एकदा घोळके तयार होतातच व ह्या घोळक्यातील मानसिक वातावरणावरही समाजाची सावली पडलेली असतेच. 'घोळक्याचे 'अलिखित नियम तयार होतात. घोळक्यात कोण सामील होऊ शकते व कोण नाही हे पुन्हा त्याचे कुटुंब व कामाचे स्वरूप यावरूनच ठरविले जाते. येथेही माणसाच्या व्यक्तिमत्वाला आकार येत असतोच. कुटुंब व कार्यजीवन यामध्ये जी बंधने बाह्य वाटतात तीच बंधने या मैत्री जीवनात स्वत:हून स्वीकारली जातात. ती मताचा भाग बनतात. सगळ्यांना चहा पाजणे हा अलिखित नियम मी पाळला नाही तर मी एकटा पडण्याची भीती असते. एकटेपणा ही सर्वात मोठी शिक्षा असते. या तिन्ही ठिकाणी माणसाच्या मनावर संस्कार होत असतात. पण मूळ माणूस कोठे घडविला जातो असा कोणी प्रश्न विचारसा तर पटकन उत्तर मिळते, 'अर्थात कुटुबांत' अगदी लोकप्रिय भाषेत बोलायचे झाले तर 'बाळ आपल्या पायावर उभे राह्यला लागेतोवर ऊन, वारा, पाऊसपाणी यापासून संरक्षण देणारे उबदार घरटे म्हणजे कुटुंब.' येथे काऊचिऊची गोष्ट आठवते, पक्षी व प्राणी याच्याशी तुलना करण्याचा मोह होतो. या सोप्या पृष्ठभागीय साम्यामुळे मानवाचे वेगळेपण विसरले जाते व कुटुंब हा समाजाचाच एक भाग आहे, एक सामाजिक संस्था आहे याचे भान संपते. कुटुंब म्हणजे सुखाने संरक्षित बेट असा भ्रम तयार होतो. ते 'नैसर्गिक' वाटू लागते, जीवशास्त्रीय वाटू लागते. ही एक भूमिका झाली.

**कुटुंब : एक शाळा**

दुसरी भूमिका अशी, माणसाचा जन्म कुटुंबाच्या चौकटीत होतो. म्हणूनच माणसाचे व्यक्तिमत्व हे कुटुंबातील वातावरणातच मूलत: घडविले जाते आणि हे व्यक्तिमत्वाचे कंगोरे घेऊन तो सामाजिक व्यवहारात भाग घेतो. सामाजिक व्यवहाराला आकार देतो. रंग देतो. कौटुंबिक जीवन जितके उत्तम, आर्दश, निखळ तितके माणसाचे व्यक्तिमत्व शुध्द आणि असा माणूस जेव्हा सामाजिक व्यवहारात भाग घेईल तेव्हा तो सामाजिक व्यवहार अधिक सचोटीचा, सत्यम् , शिवं, मगंलम्

होईल असा खोटा आशावादही सापडतो. काहीसा अशा प्रकारचा सूर श्री आशा मुंडले यांच्या मागील वर्षी (1975) स्त्री मासिकात आलेल्या लेखमालेमध्ये आढळतो. त्यांचा आरोप असा की आज भ्रष्टाचार, गैरप्रकार, ढोंगे, बुवाबाजी, स्त्रीपुरूष–नीत्तीमत्ता, लैगिंक स्वातंत्र्य या सामाजिक प्रश्नाबाबत आरडा ओरड केला जातो. पण 'समाजजीवन फक्त उंबऱ्याच्या आत निरोगी व उंबऱ्याबाहेर भ्रष्ट कसे असू शकेल?' थोडक्यात कुटुंबजीवन सुधारणे ही व्यक्ती सुधारण्याच्या मार्गातील व वैचारिक परिवर्तनातील आद्य गरज आहे. या दृष्टीकोनामध्ये कुटुंब हे केवळ सुरक्षित ऊबदार घरटे एवढीच भूमिका घेतलेली नसून कुटुंब ही एक प्रकारची शाळा आहे. तेथील संस्कार हे आयुष्यावर महत्वाचे असतात, या वास्तवाचे भान ठेवले गेले आहे. आणि तरीसुध्दा हा दृष्टिकोन अपुरा आहे. आईवडील, बहिण भाऊ, आजी आजोबा, मावश्या, काका ठराविक दृष्टिकोन घेऊन जन्माला आलेली असतात. प्रत्येकाकडे समाजाने एक मार्गदर्शक त्तत्वांची यादी दिलेली असते. त्यानुसार ही माणसे मुलांना वळण लावताना असे गृहीत धरले गेले आहे. ही मार्गदर्शक त्तत्वांची यादी बदलली की मुलांचे वळण सुधारेल असा भाबडेपणा या दृष्टिकोनाचा येतो. ही मार्गदर्शक तत्वे काही सनातनी विचारवंतानी मुद्दाम बनवून स्वत:च्या हुकुमतीखाली त्यांचे आचरण करण्यास भाग पाडले असाही भ्रम यात गृहिच धरलेले दिसतो. जुनी वर्तणूक चूक आहे, ती सुधारून नवी कशी आणावी याची पथ्ये देऊन हा दृष्टीकोन थांबतो. पण अजूनही जुन्याचीच चलती का आहे, लोकांना नव्यातील चांगलेपणा का दिसू शकत नाही याची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न येथे नाही. कारण कुटुबांचा जन्म कसा होतो, कुटुंब या संस्थेस सामाजिक कार्य नक्की काय आहे. समाज कसा चालतो. कुटुंबात दिली जाणारी शिकवण कोणत्या सामाजिक गरजांपायी तयार होतो याची छाननी केली जात नाही. आज आपल्याला नेमके तेच करण्याची आवश्यकता आहे.

याच दृष्टिकोनातून कुटुंबजीवनाचा व्यक्तिमत्व घडणीवर परिणाम याबाबत निश्चित भूमिका घेता येईल. याबाबत एकच गोष्ट लक्षात ठेवली पाहीजे की कुटुंब हे सुरक्षित बंदर असले तरी त्या बंदरातील पाणी व बाहेरील अथांग समुद्र हे एकाच समाजजीवनाचे भाग आहेत. समुद्रातील अंतप्रवाह या बंदराला येऊन भिडतात. आईवडील, बहीण भावंडे ही या समुद्रावर संचार करूनच पुन्हा बंदरात येतात. या संचारातूनच त्यांच्या मनावर परिणाम होत असतो. ते परिणाम त्या जाणीवा बंदरात उभ्या असलेल्या छोट्या मुलावर संस्कारित होत असतात. म्हणूनच उंबऱ्याबाहेरील समाजजीवनाचाही मुलाला व कुटुंबातील वातावरणाला सतत स्पर्श होत असतो. आणि या वातावरणात वाढलेले बाळच उंबऱ्याबाहेरच्या भ्रष्ट समाजजीवनात पाय रोवून उभे राहू शकते. कारण भ्रष्ट समाजजीवनामध्ये आपण लाथा कधी खायच्या आणि दुस–याला कधी द्यायचा याबद्दलचे कसब त्याच्या अंगी बाणलेले असते. याचाच अर्थ आपण माणसाचे जीवन जरी तीन विभागामध्ये वाटून टाकले तरी ह्या तिन्ही विभागांचा एकमेकांशी अविभाज्य संबंध असतो. वडिलांच्या कार्यजीवनाचा मुलाच्या कुटुंबजीवनावर परिणाम होतो. कार्यजीवन व कुटुंबजीवन यांना पूरक असेच मैत्रीजीवन रहाते झोपडपट्टीत राहणाऱ्या कामगाराच्या मुलाला कोपऱ्यावरच्या पानपट्टीवाल्याच्या दुकानासमोरुन उभे राहून मैत्री जीवन जगता येते. कारण तुमचे अस्तित्व सामाजिक असते. आणि कुटुंबजीवन कार्यजीवन, मैत्रीजीवन येथे होणारे संस्कार व तयार होणारे भावजीवन मनोवृत्ती या व्यक्तिच्या सामाजिक अस्तित्वाने ठरविल्या जातात. सामाजिक अस्तित्व सामाजिक संबंधाच्या चौकटीत फुलत राहते. हे सामाजिक संबंध उत्पादन–संबंधाच्या पायावर आधारीत असतात. उत्पादनसंबंधाची मुळे उत्पादन व्यवस्थेमध्ये रुजलेली असतात. उत्पादनाशिवाय माणूस जगू शकत नाही. उत्पादन ही मानवी अस्तित्वाची प्राथमिक गरज आहे. सध्या मानवी मनाची होणारी घडण – कुटुंबसंस्थेचे कार्य – कुटुंबव्यवस्थेचे समाज–संघटनेमधील स्थान एवढी सुसूत्र साखळी

लक्षात आली तरी पुरे. यातूनच कुटुंब म्हणजे नक्की काय यासंबधी एक निश्चित पण सर्वसामान्य स्वरूपाचे आकलन होऊ शकेल.

कुटुंब म्हणजे नक्की काय? मानवाचा जन्मापासूनचा बराचसा काळ कुटुंबात जातो माणसामाणसातील पहिले नाते कुटुंबात सापडते. आपण माणूस नावाच्या प्राणीजातीचा सभासद आहोत याची जाणीव कशी करावी याते पहिले धडे तेथे मिळतात. बाहेरील सामाजिक व्यवहाराचे वादळी वारे या सुरक्षित घरट्याला लागत नसले तरी त्या व्यवहाराची चुणुक पाहयला मिळते. थोडक्यात कुटुंब हे बाहेरच्या भव्य समाजाची छोटीशी प्रतिकृती असते. व्यक्तिव्यक्तितील सामाजिक संबंधाचे प्रतिबिंब येथे पहायला मिळते. लुटुपुटुच्या लढाया लढण्याचे शिक्षण येथेच मिळते. म्हणूनच माणूस सामाजिक जीवनातील आपापली भूमिका व्यव्स्थितपणे स्वीकारतो व पार पाडतो. हे सर्व कशा तऱ्हेने होते ते आपण पुढे बघणार आहोत.

**कुटुंबसंस्था नष्ट होते आहे काय?**

शास्त्रीय अभ्यासाच्या पूर्वी थोडीशी एका प्रचलित गैरसमजाची दखल घायला हवी. कुटुंबसंस्था जन्माला येऊन आज शेकडो वर्षे झाली. त्यामुळेच समाज म्हटला की कुटुंबव्यवस्था आलीच. हे सर्वसामान्य माणसाच्या मनावर इतके पक्के बिंबले आहे की पुढे कुटुंबव्यवस्था रहाणार नाही असे कोणी भाकीत केले की लोक त्याला वेड्यात काढतील किंवा तो स्वैराचारी आहे. अशी त्याची संभावना करतील. पण गंमतीची गोष्ट म्हणजे आजही काही पाश्चात्य देशात कुटुंबव्यवस्था डळमळू लागलेली आढळते. घटस्फोटाचे वाढलेले प्रमाण, व्यवसाय महत्वाचा. मग मुलांकडे लक्ष कोण देणार असे म्हणून मूल नको म्हणणाऱ्या युवती, किंवा पुरूषी वर्चस्व नको म्हणून अविवाहित रहाणाऱ्या तरूणी यांचे प्रमाण वाढताना दिसते आहे. त्याचप्रमाणे कुटुंबामधून ज्या सोयी माणसाला मिळत असतात त्यांचे बऱ्याच प्रमाणात सामाजिकरण झाले आहे. मुलांवरील संस्काराचे काम वयाच्या तिसऱ्या वर्षापासून शाळांनी उचलेले आहे. आजाऱ्यांची, म्हाताऱ्यांची सेवाशुश्रुषा करण्याचे काम रूग्णालये, वृध्दाश्रम येथे केले जाते. धुलाई, स्वयंपाक वगैरे सेवा बाहेर सहज मिळतात. वेश्यामुळे शरीरसुखाची गरज भागू शकते. अशा स्थितीत कुटुंबाची गरज काय हे मुख्य म्हणजे पूर्वी संपत्तीला वारसा म्हणून तरी मुंलाची गरज भासे. आजकाल सामान्य माणसाकडे ना जमीन, ना घर, ना कारखाना. तेव्हा संपत्तीच्या वारशासाठी मुलांची गरज उरली नाही. थोडक्यात कुटुंबसंख्येचे कार्य संपलेले आहे. हे झाले वरवरचे चित्र.

आपल्याकडे जेव्हा कोणी ही भीती व्यक्त करतात तेव्हा मात्र कीव कराविशी वाटते. आपल्याकडे अविभक्त कुटुंबपध्दतीतून विभक्त कुटुंबपध्दतीमध्ये होणाऱ्या बदलाला अजूनही पुरेशी गती आलेली नाही. हिंदू अविभक्त कुटुंब कायद्यासारखे कायदे करून संपत्तीमालकाच्या संपत्तीवर कर कमी बसविण्याचे प्रयत्न चालू आहेत. व अविभक्त कुटुंबपध्दत मोडण्याची गरज त्यांना भासत नाही. तसेच कुटुंबातील सेवांचे सामाजीकरण पुरेसे झालेले नाही. औद्योगिकरण झपाट्याने होत नसल्याने स्त्रीला नोकरीसाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडावे लागले नाही. गृहिणीला पोट भरण्यासाठी अजूनही नवऱ्यावर अवलंबून रहावे लागते. शहरातील कामगाराकडे खेड्यात रहाणाऱ्या भावाची मुले शिकायला, नोकरी करायला असतात. बेकारांना सामावून घेण्यासाठी कुटुंबे ही आवश्यक संस्था आहे. कुटुंबातील घट्ट ऋणानुबंधामुळे ले ऑफ दिलेल्या कारखान्यातील कामगार भावाकडे बहिणीकडे दोन वेळचे जेवण घेऊ शकतो. तेव्हा कुटुंबसंस्थेने येथील जीवितकार्य संपलेले नाही.

अर्थात येथे कुटुंबव्यवस्था चांगली की वाईट हा प्रश्न नसून तिचे कार्य समजून घेण्याचा हा प्रश्न आहे. पुष्कळसे विचारवंत जेव्हा भारतीय संस्कृतीचे व आदर्श कुटुंबव्यवस्थेचे गोडवे गातात व पाश्चात्य देशांच्या आत्यतिंक व्यक्तिवादाला व उपभोगी प्रवृत्तीला नावे ठेवताता त्यांनी ही गोष्ट लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे की समाजाच्या विकासाच्या वेगवेगळ्या अवस्था असतात. टप्पे असतात त्या त्या अवस्थेची सामाजिक गरज म्हणून काही संस्था निर्माण होतात. कल्पनाव्यूह तयार होतो. त्या अवस्थेचा भौतिक पाया बदलला की हळू हळू समाज संघटनाचे स्वरूप बदलते. संस्थाचे स्वरूप बदलते. कुटुंबसंस्था ही त्रिकालाबाधित तत्व तर नव्हेच नव्हे किंबहूना मानवाची नैसर्गिक गरजही नाही. तो विशिष्ठ समाज संघटनेतील माणसाची सामाजिक गरज आहे. आज केवळ नवी पिढी जुन्या पिढीच्या आज्ञांचे बिनचूक पालन करायला तयार नाही. त्यांच्या आवडीनिवडी, नीतीकल्पना यांमध्ये थोडासा बदल दिसू लागला आहे. मुलांच्या मनावरही चित्रपट, साहित्य, शिक्षण यांतून होणाऱ्या संस्कारांचे प्रमाण वाढले आहे. तेही शहरातून. आणि त्यामुळेच विचारवंत घाबरून जाऊन प्रश्न विचारू लागले आहेत. 'कुटुंबसंस्था नष्ट होते आहे काय?'

मध्यमवर्गीय सुरक्षित चिरेबंदी कुटुंबव्यवस्थेला किंचित धक्के बसायला लागले आहेत. पण कामगार वर्गाची अवस्था त्याहून कठीण आहे. उत्तर प्रदेशातून येणारे भैय्ये आपण बघतो. आणि त्यांच्यावर विनोदही करतो. दोन वर्षे गावी न गेलेल्या भैय्या जेव्हा हातावर पेढे ठेवून 'मुझे बच्चा हो गया' असे कौतुकाने सांगतो तेव्हा आपणा दुष्टपणे हसतो. मध्यमवर्गीय बायका तावातावाने वेश्याव्यवसायाचे समर्थन करतात. 'तसल्य बायका आहेत म्हणून बरे हो, नाहीतर या मेल्या पुरूषांची नजर आमच्यासारख्या कुलवान स्त्रियांकडे वळायची' असा युक्तिवाद ऐकता ऐकता कुठेतरी खोलवर जाणीव होत रहाते. की कुटुंबसंस्था कोसळत आहे. ही मध्यमर्गीय भीती कामगारासांठी आजच वास्तव आहे. मुबंईच्या रामा गड्याची बायको तिकडे कोकणात भातखाचर सांभाळत असते. मुबंईच्या औद्योगिक चुबंकीय क्षेत्रात पुरूष जोडले जातात. कुटुंब ठेवायला जागा मिळत नाही. दहाबाय दहाच्या खोलीत पाळीपाळीने झोपावे लागते. आणि घरधनीण तिकडे सुपारीच्या झाडांना पाणी देत वर्षातून एकदा माघारी येणाऱ्या चाकरमान्याकडे डोळे लावून आसते. हे कुटुंबव्यवस्थेचे कोसळणे म्हणायचे की लवचिकता म्हणायची? म्हणूनच आज संक्रमण काळातील कुटुंबव्यवस्थेचे स्वरूप पहाणे आवश्यक आहे.

- मागोवा, एप्रिल 1976 मधून साभार

chhaya.datar1944@gmail.com;

●●●

# रॅट रेसचा विळखा!

*प्रभाकर नानावटी*

खाजाउ विवेक मानसिकता

तुम्हाला आपण फार असहाय आहोत, अगतिक आहोत असे वाटते का? कुणीही आपली दखल घेत नाही अशी भावना अधूनमधून येत असते का? या जगात आपला निभाव लागणार नाही हा विचार येत असतो का? अस्तित्वासाठीची स्पर्धा, स्पर्धेतून स्वार्थ, भीती, व इतरांचा दुस्वास इत्यादीमुळे आपण मानसिक स्वास्थ्य हरवून बसलो आहोत असे वाटत असते का?

असे काही वाटून घेणारे तुम्ही एकटेच नाही. हे जे वाटणे आहे ते मानसिक अनारोग्याचे लक्षण आहे असेही वाटून घेण्याचे कारण नाही. आताची बदलत असलेली परिस्थितीच या मानसिकतेचे, असमाधानीवृत्तीचे प्रमुख कारण असावे असे काही

तज्ज्ञांचे मत आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यातील नवउदार भांडवलशाही (neo-liberal capitalism) व त्यातून होत असलेले बाजारीकरण तुम्हा – आम्हाला हद्दपार करण्याच्या बेतात आहे. या गोंधळलेल्या परिस्थितीतून मार्ग शोधणे – किंवा निदान त्याबद्दल विचार करणे – यात गैर काही नाही. स्वतःची आयडेंटिटी जोपासण्याचे प्रयत्न करणे यातही काही चूक नाही.

मुळात आपण सामाजिक प्राणी आहोत. पिढ्यान पिढ्या जोपासलेल्या अनेक गोष्टीतून व जीवनमूल्यामधून आपल्याला एक आयडेंटिटी प्राप्त झालेली असते. समाज आपल्या आयडेंटिटीला आकार देत असतो. आपण normal आहोत की abnormal हे समाज ठरवत असते. तरीसुद्धा समाजाबरोबर जावे की त्याच्याशी फटकून वागावे या निवडीचे स्वातंत्र्य आपल्याला असते.

यापूर्वीच्या समाजातील बदल फारच संथगतीचे होत गेल्यामुळे काही अपवाद वगळता मागच्या पिढीतल्यांना स्वतःच्या आयडेंटिटीबद्दल फारसे विचार करण्याची गरज पडली नसेल. परंतु गेल्या 30 - 40 वर्षात समाज स्थितीत फार मोठा बदल झाल्यामुळे आपण नेमके कुठे आहोत हेच कळेनासे झाले आहे.

आजच्या समाजाच्या सर्व व्यवहारावर बाजारीकरणाची गडद सावली आहे. बाजारीकरणाच्या आक्रमकतेमुळे एकामागून एक असे सर्व क्षेत्र भांडवली व्यवस्थेत बंदिस्त होत आहेत. बाजारीकरणातच सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्यांची उत्तरं दडलेली आहेत असे त्याच्या पुरस्कर्त्यांची खात्री आहे. राज्यकर्ते जितके नियंत्रण कमी करू शकतील, जितके कर कमी करू शकतील, तितक्या प्रमाणात समाजविकास होत राहील असे त्यांना वाटत आहे. सार्वजनिक सेवांचे खाजगीकरण व्हावे, सार्वजनिक हितासाठीच्या कामांना कात्री लावावी, उद्योगव्यवस्थेला पूर्णपणे नियंत्रण मुक्त करावे, रोकडसुलभता असावी, भांडवलाच्या अंतरराष्ट्रीय हस्तांतरणाला नियमांच्या चौकटीतून मुक्त करावे ही मानसिकता व त्याकडे वाटचाल प्रबळ होत आहे. मार्गारेट थॅचर व रोनाल्ड रीगन यांच्या काळापासून हे लोण पसरत असून कुठल्याना कुठल्या स्वरूपात ती जगभर पाय पसरत आहे. या बाजारीकरणाला अपवाद असलेला एकही देश या पृथ्वीवर नसावे अशी आताची स्थिती आहे.

खरे पाहता बाजारीकरणाचा डोलारा प्राचीन ग्रीक संस्कृतीच्या *मूल्ये जन्मजात असतात* या तत्वावर व *मानवजात स्वार्थी व अप्पलपोटी असणार* या क्रिश्चियन गृहितकावर उभा आहे. व आतापर्यंतची समाज-व्यवस्था या गोष्टींचे नियंत्रण करत असल्यामुळे त्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांची झळ सामान्यापर्यंत पोचली नव्हती. आता मात्र या (अव)गुणांचे उदो उदो होत आहे. नियंत्रणाऐवजी प्रोत्साहन मिळत आहे. स्वयंप्रेरित अनिर्बंध स्पर्धेतूनच व भांडवली नफेखोरीतूनच नवीन शोध, इनोव्हेशन्स, आर्थिक वाढ, होत होत शेवटी मानवाचे कल्याण होणार असा आत्मविश्वास व्यक्त केला जात आहे.

`लोक आपल्या अवस्थेला स्वतःच कारणीभूत आहेत. गरीबीत रहायचं की नाही हे त्यांनीच ठरवायचं आहे. वर यायचं असेल तर त्यांनी शासनाच्या आधाराची अपेक्षा करता कामा नये.'

बाजारीकरणात अमाप भांडवलाबरोबर मेरिटचेही फार मोठ्या प्रमाणात कौतुक केले जात असते. बौद्धिक क्षमता, परिश्रमातील सातत्य, व इनोव्हेटिव्ह माइंड ज्याच्यांकडे आहे त्यानाच कुठल्याही स्पर्धेतील यशाची किल्ली मिळू शकते, याबद्दल कुणाचेही दुमत नसते. त्याचप्रमाणे या गोष्टी असणाऱ्यांना वाटेल ती किंमत देऊन विकत घेता येते याचीसुद्धा सोय येथे होत असते. याचा परिणाम जीवघेण्या स्पर्धेत होत आहे व बहुतेकांना या रॅट रेस मध्ये सहभागी व्हायचे आहे. त्यामुळे ज्यांना संधी मिळते वा जे संधीच्या शोधात आहेत त्यांचेच हे जग आहे. आणि इतरांना येथे स्थान नाही.

परंतु वास्तव फार वेगळे आहे. ही रॅट रेस सर्वांना समान संधी देऊ शकत नाही. काही (मोजके चाणाक्ष) स्मार्ट अगोदरच या

शर्यतीच्या विनिंग लाइनजवळ उभे आहेत. व शिट्टी वाजवली की तेच सर्वांच्या अगोदर पोचतात व शर्यत जिंकतात. बाजारावरील नियंत्रण दूर करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली तेंव्हापासूनच समान संधी नाकारली गेली हे विसरता येत नाही. उत्कर्षाच्या शिडीच्या खालच्या पायरीपाशीच बहुतेक जण घुटमळत आहेत, एकमेकाचे पाय ओढत आहेत. व यातूनही काहींना वरच्या पायरीवर जाणे शक्य झाले तरी त्यांना वर येऊ न देण्यासाठी काही अडथळे उभे करणारे ठिकठिकाणी आहेत. रशियातील कम्युनिस्ट राजवट संपल्यानंतरसुद्धा त्या देशातील सर्वांना समान संधी उपलब्ध नव्हती. कारण काही मूठभर लोकांच्या हातात अमाप संपत्ती एकवटली होती व त्यांचे केजीबीशी लागेबांधे होते. व हेच मूठभर लोक बाजारीकरणाचे गोडवे गात होते. खरे पाहता उदारीकरणाच्या सिद्धांतानुसार विलक्षण बुद्धीमत्ता, सर्जनशीलता किंवा अविश्रांत परिश्रम असलेल्यांच्याकडेच संपत्ती हवी. परंतु यापैकी कुठलेही गुणविशेष या श्रीमंतांच्या जवळ नव्हते.

बुद्धीमत्ता वा परिश्रमांची फळंसुद्धा फार काळ टिकत नाहीत. पहिल्या पिढीतील उद्योजकांनी स्वतःच्या हिकमतीवर व इनोवेशनच्या जोरावर उद्योगधंदे उभारून संपत्ती गोळा केली असली तरी नंतरच्या कालखंडात स्पर्धेची झळ लागणार नाही याची शाश्वती देता येत नाही. इनोवेशन्स सतत होत असतात. त्यामुळे नवीन उद्योग धंदे उदयास येत काही उद्योग धंद्याना कालबाह्य ठरवतात. त्यामुळे बापाच्या पैशाच्या जोरावर उद्योजकांची पुढली पिढी टिकून राहील याची खात्री देता येत नाही. कुठल्याही कालखंडात नाविन्यतेला, त्याच्या उपयुक्ततेला अग्रक्रम दिला जातो. अमेरिका वा ब्रिटन सारख्या प्रगत भांडवली देशातसुद्धा याचा प्रत्यय येत असतो.

नवउदार भांडवलशाहीच्या पुरस्कर्त्यांनी आणि त्यांनी पाळलेल्या तथाकथित विचारवंत व विशेषज्ञांनी मेरिटच्या जोरावर समाजहित साधण्यासाठी, सर्वांना समान पातळीवर आणण्यासाठी व समान संधीसाठी प्रयत्न करावेत. केवळ पैशाच्या जोरावर आपापल्या मुलाबाळांना अत्याधुनिक शिक्षण देवून आपण किती इनोवेटिव्ह आहोत असे शेखी मिरवण्यात हशील नाही. परंतु हे विधान त्यांना अजिबात पटण्यासारखे नाही. म्हणूनच सर्व उद्योगधंद्यांना भाडोत्रीपणाचे स्वरूप येत आहे.

या गोष्टींना एक वेळ दुर्लक्ष केले तरी बाजारीकरणाच्या अपयशाला व्यक्तीच्या नाकर्तेपणाला जबाबदार धरले जाते. श्रीमंतांचे सगळे बरोबर व गरीबांचेच काही तरी चुकते, आर्थिक व नैतिक दृष्ट्या त्यांच्यातच उणीवा असल्या मुळे प्रगती रखडत आहे, असे दोषारोप गरीबावर केले जातात. त्यांच्या दृष्टीने गरीब जनता या आधुनिक समाजाला लागलेली कीड आहे, ते सर्व बांडगुळं आहेत, ही मानसिकता जोपासली जात आहे.

बाजारीकरण माणसांना स्वायत्तता व स्वातंत्र्य देत त्यातून मानवजातीचे कल्याण होत राहणार, अशी स्वप्नं दाखवत होत होती. परंतु त्या अपेक्षा फोल ठरत आहेत. त्याऐवजी माणसांना कस्पटासमान लेखण्यातच धन्यता मानले जात आहे. त्यामुळे संवेदनशील माणूस बाजूला फेकला जात आहे. एकाकी ठरत आहे. कामाच्या ठिकाणी असेसमेंट, मॉनिटरिंग, मेजरिंग इत्यादींचा अतिरेक होत असून नियोजनाची सर्व सूत्रे लांब असलेल्या कुठल्यातरी अनामधेयाकडून हलत असल्यामुळे रॅट रेसमध्ये यशस्वी होत असलेल्यांना सर्व सोई–सुविधा, सवलती, उत्तेजनार्थ बक्षीस, पदोन्नती व मागे राहिलेल्यांना शिक्षा, दंड, पदावनती किंवा प्रसंगी पदच्युती यांना सामोरे जावे लागत आहे. या प्रकारच्या धोरणामुळे कामाच्या ठिकाणी भीतीयुक्त वातावरणाची किंवा मॅनिप्युलेट करत पुढे पुढे राहण्यासाठीच्या वृत्तीची वाढ होत आहे. स्वायत्तता, उद्योजकता, नाविन्यतेचा शोध घेण्याची आकांक्षा, निष्ठा या गोष्टी हळू हळू नष्ट होत असून त्याऐवजी औदासीन्य, भीती, मत्सर, स्वार्थीपणा इत्यादी प्रकारच्या भावना रुजत आहेत. व्यवस्थापनाच्या शिस्तीच्या बडग्यामुळे

वरिष्ठांना खुश ठेवणे, त्यांना आवडतील तसेच अहवाल, खोटे खोटे आकडेवारी सादर करणे यावर भर दिला जात आहे. अशा वेळी रशियाच्या भ्रष्ट राजवटीत सेंट्रल ब्युरोच्या अंदाजाप्रमाणे आकडे कमी जास्त केलेल्यांची आठवण येते.

हेच पाशवी बळ बेरोजगारांनासुद्धा छळत आहे. बेरोजगारीच्या तापदायक व्यथेबरोबरच यांना या वेगवेगळ्या पातळीवरील छक्के पंजे समजून घेण्यातही वेळ व श्रम खर्ची घालावे लागत आहे. मुळात नवउदारभांडवलवादातच comparison, evaluation व quantification अंतर्भूत आहेत. त्यामुळे कागदावर जरी आपल्याला हवे ते निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असले तरी प्रत्यक्षात आपल्याकडे काहीही नाही. परिस्थिती आपल्याला निर्वीर्य व निःशक्त बनवत आहे. सर्व राजकीय पक्ष या प्रक्रियेत सामील झालेले आहेत. त्यामुळे बेरोजगारांना राजकीय पाठबळही मिळेनासे झाले आहे. स्वातंत्र्य आणि स्वायत्तता ऑटोनामीच्या मुखवट्याखाली दबलेले असून बिनचेहऱ्याच्या मनमानी करणाऱ्या नोकरशाहीच्या हातात समाज नियंत्रणाची सूत्रे दिलेली आहेत.

हा बदल व ही विदारक परिस्थितीच वैयक्तिक जीवनात अनेक मनोविकारांना जन्म देत आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. स्वतःची हेटाळणी, विषण्णता, व्यक्तिमत्व विकृती, बेशिस्त जीवनशैली इत्यादींना ती जन्म देत आहे. व्यक्तिमत्व विकृतीत चिंता व समाजाविषयी भीती असल्यामुळे इतरांकडे सदोष दृष्टीने बघितले जाते. कारण इतर सर्वजण त्याच्याशी स्पर्धा करणारे किंवा त्याचे मूल्यांकन करणारे आहेत अशी भीती त्यांच्या मनात असते. त्याच्या दृष्टीने या इतरांना समाजात मान्यता असल्यामुळे आपण किस झाडकी पत्ती हा न्यूनगंड रुजत आहे.

एकलकोंडेपणा आणि विषण्णता यांना हैराण करत आहेत. कामाच्या ठिकाणी त्यांचे स्वत्व पिळवटून टाकले जात आहे. जे शेवटच्या पायरीवर आहेत त्यांना अपराधीपणाने ग्रासले आहे. स्वतःबद्दल सांगण्यासारखे काहीही शिल्लक नसते. यश मिळाले की फुगवून जायचे व न मिळाल्यास स्वतःलाच दोष द्यायचे. गंमत म्हणजे या यशापयशात त्यांचा दूरान्वयानेही काडीचा संबंध नसतो.

जर या जगात तुम्हाला, आपण बाजूला सारले जात आहोत, आपले स्वत्व हरवत आहे, या जगात अयशस्वी ठरत आहोत असे टोचत असल्यास अजूनही तुमच्यात संवेदनशीलता शिल्लक आहे म्हणण्यास वाव आहे. खरे पाहता इतरांनी दुर्लक्ष केलेल्या काही मूल्यांना तुम्ही मानता यातच तुमचा मोठेपणा आहे. त्याचा तुम्हाला अभिमान वाटायला हवा. त्यामुळे आपण गर्वाने ताठमानेने जगण्यालाच जगणे म्हणतात असे जगाला ओरडून सांगू शकतो.

संदर्भः Paul Verhaeghe, यांचा What About Me? हा लेख

pkn.ans@gmail.com

●●●

# संपादक, आजचा सुधारक ...

*दिवाकर मोहनी*

आपल्या नोव्हेंबर 2014 च्या अंकात अरुण फाळके ह्यांचे पत्र प्रकाशित झाले आहे. त्यांचे पत्र वाचून असे वाटले की, त्यांनी माझे धर्म–धर्मनिरपेक्षता वगैरे विषयावरील तीन लेख वाचले नाहीत; त्यांनी केवळ शेवटचा लेख वाचला आहे.

त्यांचा लेखकाच्या शीर्षकावर आहे. धर्म आणि धर्मनिरपेक्षता ह्यातील 'धर्म' ह्या शब्दाच्या ऐवजी 'हिन्दुधर्म' म्हणायला हवे होते असे ते म्हणतात. त्याबद्दल माझा खुलासा असा की, हे शीर्षक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एके काळचे बौद्धिकप्रमुख श्री. मा.गो. वैद्य ह्यांच्या एका पुस्तकाच्या वाचनानंतर मी घेतले आहे. त्यांनी हिन्दु–धर्माची व्याख्या करताना ती कशा प्रकारे केली आहे की 'ह्या जगात धर्म ह्या संज्ञेला पात्र अशी एकच विचारप्रणाली आहे आणि ती हिन्दुधर्माची होय आणि त्यामुळे धर्म आणि हिन्दुधर्म ह्यांत काही फरक नाही. हे लेख मी सुमारे 22 वर्षांपूर्वी बाबरीमशिदीचा विध्वंस होण्यापूर्वी लिहिलेले आहेत. पण त्यांचे औचित्य अजून कमी झालेले नाही असे वाटल्यामुळे संपादकांनी ते पुन:प्रकाशित केले आहेत.

अगदी अलिकडे सुमारे 2 महिन्यांपूर्वी डॉ. मोहनजी भागवत सरसंघचालक, ह्यांनी असे विधान केले की भारतात राहणारे सगळेच हिन्दु आहेत. तेव्हा धर्म आणि हिन्दुधर्म ह्यात फरक नाही असे आजही त्यांचे मत आहे. त्यामुळे हे शीर्षक फार चुकले आहे असे मला वाटत नाही.

फाळके म्हणतात की ते 'हिन्दु' म्हणून जन्मले पण त्यांना भारताच्या उज्वल परंपरेचा अभिमान वाटत नाही. ते कुठल्याही देवळात जात नाहीत, कुठल्याही देवाचे स्तवन करीत नाहीत, कुठलाही सण पाळत नाही, कुठलाही देव मानत नाहीत (ह्यात अल्ला व आकाशातील बापही आले) असे असूनही ते हिन्दूच आहेत आणि त्यात लाज वाटण्यासारखे काही नाही.

पुढच्या परिच्छेदात ते म्हणतात की तथाकथित पुरोगाम्यांना ते हिन्दु आहेत ह्याची लाज वाटते. (त्यांनी अजूनही हिन्दुधर्माचा त्याग कसा केला नाही.)

माझ्या सप्टेंबर 14 मध्ये प्रकाशित झालेल्या लेखात मी हिन्दूंचे पाच वर्ग केले आहेत. त्यातल्या पाचव्या वर्गातले ते हिन्दु आहेत असे आम्ही समजायचे का?, मी तसा आहे. त्यांच्या ठिकाणी हिंदुत्वाची जर कुठलीच लक्षणे नसली तर त्यांन स्वत:ला हिन्दु का म्हणवून घ्यावे आणि ते जर हिन्दु नसतील तर हिन्दु, मुसलमान, ख्रिस्ती, शीख हे सगळेच भारतीय म्हणजे हिन्दूच आहेत म्हणजे हिन्दूंचे सगळे दोष त्यांच्यातही असतील. मग मुसलमान ख्रिश्चन हे वेगळे कसे? सर्मसमावेशक अशी हिन्दूंची व्याख्या केल्यावर ते वेगळे कसे? आणि त्यांच्यातील दोष म्हणजे आपल्यातील दोष नव्हेत का?

जर हिन्दु आणि मुसलमान वेगळे असतील तर आपल्यांतील दोष काढून टाकल्यावरच आपल्याला त्यांचे दोष दाखवण्याचा अधिकार पोहोचेल. आधी आपल्या नाकाचा शेंबूड पुसावा आणि नंतर लोकांना हसावे. असो.

धर्म हा शब्द मी का वापरला ह्याविषयी एवढे पुरे. एवढ्या धार्मिक दंगली झाल्या त्या प्रामुख्याने मुसलमानांनी सुरू केल्या ही वस्तुस्थिती आहे असे ते म्हणतात. पण वस्तुस्थिती वेगळी आहे असे ह्या विषयाच्या अभ्यासकांचे मत आहे. हिंदूंनी मुसलमानांच्या प्रार्थनेच्या वेळी त्यांच्या मशिदीवरून सवाद्य मिरवणुकी नेणे, मशिदीवर रंग टाकणे अशा त्यांच्या कुरापती वेळोवेळी केल्या आहेत आणि वेळोवेळी त्यांना असुरक्षित वाटेल किंबहुना दहशत वाटले असे कार्यक्रम हिन्दूंनी केले आहेत. ह्याचेही पुष्कळ पुरावे आहेत. मुसलमानांना चिथावणे, त्यांचा प्रक्षोभ करणे व हिंसा करण्यास भाग पाडणे व दंगे सुरू झाले की त्यांच्यावर तुटून पडणे हेही हिन्दूंनी निश्चितच केले आहे. फाळके म्हणतात ती वस्तुस्थिती आम्हाला दिसत नाही. दंगली कोणी सुरू केल्या हे ठरवण्यासाठी दंगलीच्या आधी शक्तिप्रदर्शनाचे प्रयोग कोणी केले हेही तपासणे आवश्यक आहे असे मला वाटते.

मुसलमानांचे प्रबोधन करणारे जे प्रयत्न मुसलमान करतात ते मला माहीत आहेत. महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक मंडळ ह्या नावाची संस्था असून तिचे नेतृत्व शमसुद्दिन तांबोळी करीत आहे. हमीद दलवाई ह्यांनी ह्या क्षेत्रात केलेले काम सर्वश्रुत आहे. त्याशिवाय वध्र्याहून नवनिर्मिती ह्या नावाचे एक मासिक श्री. अजाणी चालवतात. ह्याशिवाय जे माझ्या परिचयाचे नाहीत असे आणखी कार्यकर्ते असणारच.

हिन्दु भेकड असल्यामुळे त्यांनी आपला पळपुटेपणा लपवण्यासाठी अहिंसेचा आश्रय घेतला आहे असेही त्यांचे मत फाळके ह्यांनी नोंदवले आहे. त्यांचा रोख महात्मा गांधींच्या अहिंसातत्त्वावर आहे असे दिसते. त्याबद्दल मला असे सांगायचे आहे. फाळकेंचा ह्याबाबतीत गैरसमज झाला आहे. गांधीजींची अहिंसा ही त्यांच्या असाधारण धैर्याची प्रतीक होती. प्रतिपक्षाने कितीही प्रक्षुब्ध करायचा प्रयत्न केला तरी आपण प्रक्षुब्ध व्हावयाचे नाही असे ठरवून त्यांच्या हिंसेला रोखण्यासाठी त्यांनी अहिंसेचा आश्रय घेतला. मार्टिन ल्युथर किंग ह्यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी अहिंसेचे धोरण का स्वीकारले हे त्यांच्या शब्दांत पुढे देत आहे.

'तीन शतकांहून अधिक काळ अमेरिकेतील नीग्रोंना जुलमाच्या लोखंडी सोट्याने झोडपून काढले आहे. दिवसभर निराशेचे आणि रात्रीच्या वेळी सहन न होण्याजोग्या अन्यायाने ते गोंधळून गेले आहेत. अशा लाजिरवाण्या परिस्थितीत राहणे भाग पडल्याने मनात कडवटपणा भरून घेऊ न त्याच प्रकारच्या द्वेषाने त्या हिंसेचा आणि जुलमाचा प्रतिकार करण्याचा मोह आम्हाला होणे स्वाभाविक आहे. पण तसे झाले तर त्यातून जन्माला येणारी नवी व्यवस्था ही जुन्या पद्धतीची प्रतिकृतीच ठरेल. म्हणून नम्रपणे पण निर्धाराने नवी व्यवस्था प्रेमावर आधारलेली असावयास हवी. भेदभाव नाकारताना भेदभाव करणाऱ्यावर आपण प्रेमच करायला हवे. आमच्या अत्यंत कडव्या विरोधकांना आम्ही म्हणतो – तुम्ही जेवढी म्हणून छळणूक करू शकता ती सर्व सहन करण्याची ताकद आमच्यामध्ये आहे. तुमच्या शारीरिक ताकदीला आम्ही आमच्या आत्म्याच्या ताकदीने तोंड देऊ .'

'तुम्ही आमच्याशी कसेही वागलात तरी आम्ही तुमच्यावर प्रेम करू.... दुष्टपणाशी असहकार करणे हे चांगुलपणाशी सहकार करण्याप्रमाणेच आमचे नैतिक कर्तव्य आहे...... आम्ही तुमच्या मनाला आणि सदसद्विवेकबुद्धीला असे आवाहन करू की ह्या प्रक्रियेत आम्ही तुम्हाला जिंकू आणि विजय दुहेरी असेल.'

ह्या उतारा 'गांधीजींचे असामान्य नेतृत्व' ह्या (पास्कल ॲलन नाझरेथ पृष्ठ 114) पुस्तकातून घेतला आहे. हिंसेचे प्रत्युत्तर हिंसेने दिल्यास व त्यात विजय प्राप्त केल्यास तात्पुरते समाधान मिळते. त्यामागे जायचे की हिंसेचे मूळ नाहीसे करायचे हे केव्हातरी ठरवणे भागच आहे.

हिसेचा प्रतिकार वा प्रत्युत्तर हिंसेने असे केल्यास हिंसेची एक अखंड साखळी निर्माण होते; ती कोणाचेच भले करीत नाही. म्हणून हिंसेचा प्रतिकार अहिंसेने करणे विवेकाचे लक्षण आहे.

dpmohoni@gmail.com

●●●